cmyk

दै. राज्य लोकतंत्र

भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा..! -संपादक

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–११५ | गुरूवार दि.१५ ऑगस्ट २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

# यंदा गोगलगायीचे संकट नियंत्रणात!

## कृषिमंत्री धनंजय मुंडेंच्या नेतृत्वात विभागाचे सूक्ष्म नियोजन; २८ जिल्ह्यात २५० मे.टन मेटाल्डिहाईडचा पुरवठा

**मुंबई । प्रतिनिधी**

**२०२२ व २०२३ च्या खरीप हंगामामध्ये गोगलगायींनी पिकांच्या केलेल्या नुकसानीच्या अनुषंगाने यंदाच्या खरीप हंगामाच्या सुरुवातीपासून राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात कृषी विभागाने केलेल्या सूक्ष्म नियोजनाचे फलित म्हणून यावर्षी गोगलगायीचे संकट पूर्णत: नियंत्रणात आले आहे.**





सन २०२२ आणि २०२३ या वर्षांमध्ये राज्यामध्ये बहुतांशी विदर्भ आणि मराठवाड्यामध्ये गोगलगायीच्या प्रादुर्भावामुळे अनेक शेती पिकाचे आणि फळ पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. त्यामध्ये जास्त नुकसान बीड, धाराशिव, लातूर, बुलढाणा, यवतमाळ आदी जिह्यामध्ये नुकसानीचे प्रमाण अधिक होते. इतरही बऱ्याच जिल्ह्यामध्ये कमी अधिक प्रमाणात नुकसान झाले होते. लातूर, बीड आणि धाराशिव या तीन जिल्ह्यामध्ये ३३ टक्के पेक्षा जास्त शेत पिकाचे आणि फळ पिकाचे नुकसान झाले, त्यांचे क्षेत्र ७२४९० हेक्टर होते तर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची संख्या १२९,५९६ इतकी होती. राज्यामध्ये गोगलगाय मुळे नुकसान होण्याची समस्या साधी होती. परंतु अलीकडील काही वर्षांमध्ये ही समस्या प्रमुख होत गेली. या बाबीची दखल घेत राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी याबाबत ◀◀ पान २ वर

### यंदा उच्चांकी उत्पादन...

*या यावर्षीच्या खरीप हंगामात चांगला पाऊस झाल्यामुळे पीक परिस्थिती चांगली असून गोगलगायीचा प्रादुर्भाव नगण्य असल्यामुळे राज्यामध्ये कृषि मालाचे उत्पादन उच्चांकि असेल् अशी भावना शेतकऱ्यांमध्ये तयार झाली आहे. राज्यातील आणि विशेष करून लातूर, बीड, धाराशिव आदी जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी कृषी विभाग आणि कृषी मंत्री धनंजय मुंडे यांचे अभार व्यक्त केले आहेत.*

# राहुल नवीन यांची ईडीच्या संचालकपदी नियुक्ती

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

अंमलबजावणी संचालनालयाचे तपास यंत्रणा (ईडी) विशेष संचालक राहुल नवीन यांची संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. केंद्र सरकारने बुधवारी (दि.१४) आर्थिक प्रकरणांवरील केंद्रीय तपास संस्था अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) पूर्णवेळ संचालकाची नियुक्ती केली आहे. तपास संस्थेचे विशेष संचालक राहुल नवीन यांची अंमलबजावणी संचालनालयाचे नवे संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ते या पदावर २ वर्षे राहतील.

राहुल नवीन हे भारतीय महसूल सेवेचे (आयकर) १९९३ च्या बॅचचे अधिकारी आहेत. यापूर्वीचे संचालक संजय कुमार मिश्रा यांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर त्यांनी गेल्या वर्षी १५ सप्टेंबर रोजी तपास यंत्रणेच्या विशेष संचालकपदाची सूत्रे हाती घेतली होती. त्यांनी अर्थमंत्र्यांचे सचिव म्हणूनही काम केले आहे. गेल्या वर्षी २०२३ मध्ये त्यांना ईडीचे कार्यकारी प्रमुख बनवण्यात आले होते. विशेष संचालक बनण्यापूर्वी राहुल नवीन प्रभारी संचालक म्हणून कार्यरत होते. त्यानंतर ते तत्कालीन संचालक संजय मिश्रा यांच्यासोबत एजन्सीत काम करत होते. ते एक ठोस ◀◀ पान २ वर


# लाडक्या बहिणीचा पहिला हप्ता जमा!

## स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला आनंदाची बातमी

**मुंबई । प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेचा पहिला हप्ता बुधवार दि. १४ ऑगस्ट पासून खात्यात जमा होण्यास सुरुवात झाली आहे. पहिला आणि दुसरा असे एकत्रित दोन हप्ते लाभार्थी महिलांच्या खात्यात जमा होत आहेत.**

बहिणींना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा प्रत्यक्षात लाभ मिळायला सुरुवात झाली. ३-४ दिवसांवर येऊन ठेपलेल्या रक्षाबंधनचे पवित्र औचित्य साधून स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला महाराष्ट्रातील बहिणींना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळायला सुरुवात झाली आहे. ३१ जुलैपूर्वी अर्ज सादर केलेल्या बहिणींच्या बँक खात्यावर जुलै आणि ऑगस्ट या २ महिन्यांच्या लाभाची रक्कम, प्रत्येकी ३००० रुपये वर्ग करण्यात आले आहेत. ३१ जुलै नंतर अर्ज सादर केलेल्या बहिणींच्या खात्यावरही लवकरच लाभाची रक्कम जमा करण्यात येणार आहे. दरम्यान, अर्ज दाखल केलेल्या



जवळपास २७ लाख महिलांचे खाते ◀◀ पान २ वर

## केजरीवाल यांची ‘सर्वोच्च’ निराशा

नवी दिल्ली : दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालयाकडून दिलासा मिळालेला नाही. न्यायालयाने त्यांच्या जामीन अर्जावर विचार करण्यास नकार दिला आहे. दरम्यान,त्यांनी सीबीआयच्या अटकेला आव्हान दिले असून त्यावर सर्वोच्च न्यायालयाने केंद्रीय तपास यंत्रणेला नोटीस बजावून उत्तर मागितले आहे. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाची पुढील सुनावणी २३ ऑगस्ट ◀◀ पान २ वर

# मी कर्जबाजारी झाल्याने निघून जातोय, मला माफ करा

## पत्नीच्या मोबाईलवर मेसेज देऊन तरुणाने घर सोडले, पोलिसांत हरवल्याची तक्रार

**परळी । प्रतिनिधी**

**परळी शहरातील अशोक नगर येथील एक ३४ वर्षीय युवक १४ ऑगस्ट २०२४ रोजी मी कर्जबाजारी झालो असल्याने निघून जात आहे मला माफ करा. असा संदेश पत्नीच्या मोबाईलवर पाठवून घरातून निघून गेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी संभाजीनगर पोलीस ठाण्यात हरवल्याची तक्रार सदरील मुलाचे वडील भगवान किसनराव अवचार वय ६१ वर्ष व्यवसाय माजी सैनिक/खाजगी नोकरी रा. अशोक नगर ता परळी जि बीड यांनी दाखल केली आहे.**



सागर भगवान अवचार हा परळी येथे थर्मल पॉवर स्टेशन येथे मँस्को महामंडात नोकरी करतो. सागर सकाळी साडे सहा वा.च्या दरम्यान ड्युटीचा ड्रेस न घालता कोणाला काही एक न सांगता घरातुन निघुन गेला आहे. असा निरोप त्याच्या पत्नीने ◀◀ पान २ वर

# शासनाने शेतकऱ्यांच्या नावाने पैसा खाल्ला

## नाना पटोले यांचा आरोप

**अमरावती । प्रतिनिधी**

महायुती सरकारने भ्रष्टाचाराचा कळस गाठला आहे. शेतकऱ्यांच्या नावाने योजना काढून त्यातूनही पैसा खाल्ला आहे. महाराष्ट्राला बेरोजगारांचे राज्य बनवले आहे. भाजपा युती सरकारचे विकासाचे मॉडेल हे केवळ दिखावा आहे. विकासाच्या नावाखाली सर्रास लूट सुरु आहे. असा आरोप करीत महाराष्ट्राला वाचविण्यासाठी आता भ्रष्ट सरकारला पायऊतार करावेच लागेल, असे प्रतिपादन काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केले. यावेळी महाराष्ट्राची निवडणूक देशासाठी महत्वाची असून, राज्यातील सत्ताबदलाचे हादरे दिल्लीलाही बसणार आहेत, असे प्रभारी रमेश चेन्नीथला म्हणाले.



विधानसभा निडणुकीच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी अमरावती येथे अमरावती व यवतमाळ जिल्ह्याची बैठक संपन्न झाली, यावेळी व्यासपीठावर, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस मुकुल वासनिक, उत्तर प्रदेशचे प्रभारी अविनाश पांडे, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, विधान परिषदेतील गटनेते सतेज बंटी पाटील, गोवा दिव दमनचे प्रभारी माणिकराव ठाकरे, सदस्य माजी मंत्री यशोमती ठाकूर, आदिवासी विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष शिवाजीराव मोघे, प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे, महिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष संध्या सव्वालाखे, युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष कुणाल राऊत, एनएसयुआय अध्यक्ष आमिर शेख, खा. बळवंतराव ◀◀ पान २ वर

## सुटीची सूचना

**आज दि. १५ ऑगस्ट २०२४ रोजी स्वातंत्र्य दिन असल्यामुळे दैनिक लोकतंत्र कार्यालयास सुटी आहे. त्यामुळे उद्या दि. १६ ऑगस्ट २०२४ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार, एजंट यांनी नोंद घ्यावी.**

**– व्यवस्थापक**

# महाराष्ट्रातील तीन पोलीस अधिकाऱ्यांना ‘राष्ट्रपती पोलीस पदक’

## १७ पोलिस अधिकाऱ्यांना शौर्य पदक तर ३९ कर्मचाऱ्यांना पोलीस पदक

**मुंबई । प्रतिनिधी**

**पोलीस सेवेतील उल्लेखनीय कार्यासाठी ७८ व्या स्वातंत्र्यदिनाच्या पूर्व संध्येला केंद्रीय गृह मंत्रालयाकडून पोलीस पदके देऊन सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्रातील चिरंजीवी रामछाबिला प्रसाद, राजेंद्र बालाजीराव डहाळे, सतीश राघवीर गोवेकर या पोलिस अधिकाऱ्यांना विशिष्ट सेवेसाठी ‘राष्ट्रपती पोलीस पदक’ प्रदान करण्यात आले. यासह राज्यातील १७ पोलिस अधिकाऱ्यांना ‘पोलीस शौर्य पदक’ तर ३९ पोलिसांना गुणवत्तापूर्ण सेवेसाठी ‘पोलीस पदक’ असे राज्यातील एकूण ५९ पोलिसांना पदके प्रदान कण्यात आली.**

‘राष्ट्रपती पोलीस शौर्य पदक’ आणि ‘पोलीस शौर्य पदक’, जीवन आणि मालमत्ता यांचे संरक्षण, गुन्हेगारीला पायबंद आणि गुन्हेगारांना अटक



करण्यासाठी उल्लेखनीय शौर्यासाठी दिले जाते. विशिष्ट सेवेसाठी ‘राष्ट्रपती पोलीस पदक’ पोलीस सेवेतील खास उल्लेखनीय कामगिरीसाठी दिले जाते. गुणवत्तापूर्ण सेवेसाठी ‘पोलीस पदक’ संसाधन आणि कर्तव्यनिष्ठेने बजावलेल्या अमूल्य सेवेसाठी प्रदान केले जाते. वर्ष २०२४ च्या स्वातंत्र्य दिनानिमित्त देशभरातील एकूण ९०८ पोलिस अधिकारी/ कर्मचारी यांना ‘पोलीस पदके’ प्रदान करण्यात आली. यामध्ये महाराष्ट्रातील ५९ पोलिसांचा समावेश आहे. विशिष्ट सेवेसाठी राष्ट्रपती पोलीस पदकांमध्ये राज्याचे चिरंजीवी रामछाबिला प्रसाद, अतिरिक्त पोलिस महासंचालक, राजेंद्र बालाजीराव डहाळे, संचालक, सतीश राघवीर गोवेकर, सहाय्यक पोलीस आयुक्त यांचा समावेश आहे. राज्यातल्या ◀◀ पान २ वर

### ६ जवानांना अग्निशमन सेवा पदक; ५ कर्मचाऱ्यांना नागरी संरक्षण पदक

स्वातंत्र्य दिनाच्या निमित्त, केंद्रीय गृह मंत्रालयाने अग्निशमन आणि नागरी संरक्षण सेवेत उल्लेखनीय कार्य बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी राष्ट्रपती पदक जाहीर केले. यामध्ये महाराष्ट्रातील एकूण ११ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. देशातील ५९ जवानांना ‘अग्निशमन सेवा पदक’ जाहीर करण्यात आले आहेत. यामध्ये महाराष्ट्रातील ६ अग्निशमन जवानांचा समावेश आहे. ५ जवानांना ‘गुणवत्तापूर्ण सेवा पदक’’ जाहीर झाले आहे. देशातील १४ कर्मचाऱ्यांना नागरी संरक्षण पदकांची घोषणा करण्यात आली आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१४ ऑगस्ट २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| गहू : ५.५० क्विंटल | | |
| २,५६३ | २,५६३ | २,५६३ |
| ज्वारी/हायब्रिड : ७२.५० क्विंटल | | |
| २,००१ | ३,२३१ | २,२८६ |
| मूग :०.५० क्विंटल | | |
| ७,००० | ७,००० | ७,००० |
| तूर : ०.५० क्विंटल | | |
| ९,००० | ९,००० | ९,००० |
| उडीद : २.५० क्विंटल | | |
| ४,९०१ | ७,४०० | ६,१५० |
| बाजरी: ६.०० क्विंटल | | |
| २,४२१ | २,६१६ | २,५१२ |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | | |
| १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: २६.५० क्विंटल | | |
| ४,२०० | ४,२५१ | ४,२२५ |
| हरभरा: ८.०० क्विंटल | | |
| ६,५८० | ६,५८० | ६,५८० |

# बीडच्या गौण खनिज अधिकाऱ्याचा पदभार काढला!

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्ह्यातील मुदत संपलेले स्टोन क्रेशर आणि खदानी चालकाकडे कोट्यावधी रुपयाची रॉयल्टी थकलेली असतानाही त्यांच्यावर कारवाई करण्याऐवजी त्यांना पुन्हा मुदतवाढ देऊन शासनाचे लाखो रुपयांचा महसूल बुडवल्याचे समोर आल्यानंतर उशिरा का होईना परंतु गौण खनिज अधिकारी काळे यांचा पदभार काढण्यात आला असल्याचे समजते.**

बीड जिल्ह्यातील खदानी आणि स्टोन यांची मुदत संपलेली असताना देखील गैर मार्गाने गौण खनिजाचा उपसा आणि स्टोन क्रेशर सुरू असल्या संदर्भात तक्रारी करण्यात आल्या होत्या. तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी संबंधितांना नोटीस बजावून यावर कारवाई करण्याचे निर्देश दिले होते त्यामध्ये बीड तहसील कार्यालयाने एका स्टोन क्रेशरवर कारवाई करत महसुलाची थकीत रक्कम संबंधिताच्या मालमत्तेवर नोंदवण्यात आली परंतु तरीदेखील यावर कोणतीही कारवाई झाली नाही. अनेक खदान मालक आणि स्टोन क्रेशर यांच्याकडे कोट्यावधी रुपयाची थकबाकी असताना पुन्हा नव्याने त्यांना मुदतवाढ देऊन सुरू करण्याचा प्रयत्न प्रशासनाच्या माध्यमातून सुरू होता. मध्यंतरीच्या कार्यकाळात आचारसंहिता असल्याने कोणतीही कारवाई झाली नाही केवळ नोटीस पाठवून काम सुरू असल्याचे दाखवले गेले मात्र आता प्रशासनानेच कारवाई सुरू केली असून, यातील प्रमुख गौण खनिज अधिकारी काळे यांचा पदभार तातडीने काढल्याची माहिती सुत्राकडून सांगण्यात आली.

## पालकमंत्री अतुल सावे आज जिल्हा दौऱ्यावर

**जालना प्रतिनिधी**

**राज्याचे गृहनिर्माण, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे मंत्री तथा जालना जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे हे गुरुवार, दि. १५ ऑगस्ट २०२४ रोजी जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या दौऱ्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.**



सकाळी ८.३० वाजता छत्रपती संभाजीनगर येथून जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे आगमन. सकाळी ८.४५ वा. भारताच्या स्वातंत्र्य दिनानिमत्त जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात आयोजित मुख्य शासकीय ध्वजारोहणासाठी ध्वजारोहण स्थळाकडे प्रयाण. सकाळी ९.०४ ते ९.३० वा.पर्यंत ध्वजारोहण कार्यक्रमास ते उपस्थित राहतील. सकाळी ९.३० वाजता महाज्योती ◀◀ पान २ वर

आमच्या असंख्य सभासद व खातेदार,ठेवीदार आणि हितचिंतकांना, स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...!

श्री.जय महेश महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्या.अंबड

रजि नं.जे.ए.एल/ए.बी.डी./आर.एस.आर/सी.आर/९०१/२८.०५.२०१३

मुख्य कार्यालय : स्व.बन्सीलालजी राठी व्यापारी संकुल, महेश चौक, जालना-बीड रोड, अंबड ता.अंबड जि.जालना (०२४८३) २७६४४९

शाखा : अंबड, जालना, तिर्थपुरी, कुंभार पिंपळगांव

श्री जय महेश महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्या अंबडची स्थापना २८/०५/२०१३ ला मंजुरी मिळालीपतसंस्थेची सुरुवात ४/११/२०१३ ला झाली सहकार्यातून सेवा, त्याग, सदाचारहेह्या ब्रीद वाक्यातुन सुरुवात झाली आहे. संस्थेचे कार्यक्षेत्र अंबड तालुक्यापुरते मर्यादीत होते आपल्या सहकार्याने ९ वर्षात संस्थेचे कार्यक्षेत्र संपुर्ण जालना जिल्हा झाले आहे. सन २०१३ या वर्षी सुरू झालेली संस्था भरीव अशी व्यवहारात वाढ करण्यात अग्रेसर ठरली आहे, त्यांचे संपुर्ण श्रेय हे संस्थेचे ग्राहक, ठेवीदार,सभासद, संचालक मंडळ व संस्थेतील कर्मचारी यांच्यामुळे शक्य झाले आहे. संस्था आपल्या ग्राहकास पुढील उपलब्ध करून दिली आहे.

* आर.टी.जी.एस. * पिग्मी/रिकरिंग * एन.ई.एफ.टी.* आय.एम.पी.एस * मिनी एटीएम (सर्वत्र एटीएम) * आय.सी.आय.सी.आय.बँक डेबीट कार्ड * क्यु.आर.कोड * मोबाईल बँकींग *आधार पेमेंट * युपीआय पेमेंट * लॉकर सुविधा * संपुर्ण संगणकीय पतसंस्था * स्वत:चे डेटा सेंटर * अद्यावत व सुसज्ज मुख्य कार्यालय ( एसएमएस सुविधा

बँक स्थापनेपासून ऑडीट वर्ग अ

संस्थापक अध्यक्षा सौ.अर्चना कैलास राठी | प्रशासकीय अधिकारी ॲड.कैलास जयनारायण राठी | मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.लक्ष्मीकांत बालासाहेब अष्टपुत्रे

शुभ मंगल ठेव योजना
रु.४७५०० भरणा केल्यास १० वर्षात रु.१०००००/-
रु.२३७८५ भरणा केल्यास १० वर्षात रु.५००००/-
दाम दुप्पट ठेव योजना ९ वर्षे चार महिने
जेष्ठ नागरीक दाम दुप्पट ठेव योजना ८ वर्षे ९ महिने
१/२ रक्कम जेष्ठ नागरीक/अपंग/विधवा महिलांना

आकर्षक कर्ज योजना
* वाहन तारण कर्ज * पगार कर्ज * ठेव तारण कर्ज * कॅश क्रेडीट कर्ज * स्थावर मालमत्ता कर्ज * सामान्य (जमीनकी कर्ज) * सोने तारण कर्ज * पिग्मी कर्ज

ठेवीवर आकर्षक व्याजदर
३० दिवस ते ९० दिवस ६%
९१ दिवस ते १८० दिवस ८%
१८१ दिवस ते ३६५ दिवस ९%
३६५ दिवस ते पुढे १०%
मासिक मुदत ठेव ९%

७५८८५२१८१८/ ८३२९६९२९७५ shrijaymaheshmnspambad@gmail.com

cmyk

## अग्रलेख

# केवळ योजना तारतील का ?

लोकसभेनंतर महाराष्ट्र, झारखंड, हरियाणा व जम्मू काश्मीर या चार राज्यांतील विधानसभा निवडणुकांकडे सध्या देशाचे लक्ष लागले आहे. त्यादृष्टीने आत्तापासूनच या रणसंग्रामाची लगबग सुरू झालेली दिसते. यातील प्रत्येक राज्यातील निवडणूक महत्त्वाची असली, तरी निवडणुकीचा मुख्य केंद्रबिंदू महाराष्ट्र हाच दिसत आहे. मागच्या पाच वर्षांत महाराष्ट्राच्या राजकारणात प्रचंड उलथापालथ झाली आहे. महाविकास आघाडीचा प्रयोग, शिवसेनेतील अभूतपूर्व फूट, राष्ट्रवादीची शकले व लोकसभा निवडणुकीत महायुतीचे झालेले पानिपत या पार्श्वभूमीवर आगामी निवडणूक होईल. ती डोळ्यासमोर ठेवूनच सध्या महाराष्ट्रातील महायुती सरकारकडून उद्घाटने, भूमिपूजनांचा सपाटा लावण्यात आला आहे. त्याचबरोबर अनेक लोकप्रिय योजनाही जाहीर करण्यात आल्या आहेत.

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' ही त्यातली अत्यंत महत्त्वाकांक्षी योजना. मध्य प्रदेशमधील वातावरण याच योजनेने फिरविले होते. त्यामुळे महाराष्ट्रातही ही योजना चमत्कार घडवेल, अशी आशा युतीचे नेते बाळगून आहेत. हे बघता पुढच्या काही दिवसांत या योजनेची लवकरात लवकर अंमलबजावणी करण्यावर सरकारचा भर असू शकतो. विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता सप्टेंबर महिन्यातच लागू झाली, तर सरकारला या योजनेच्या प्रसिद्धीसाठी पुरेसा वेळ मिळणे कठीण बनेल. त्यामुळे दिवाळीनंतरच निवडणूक होणे राज्य सरकारला श्रेयस्कर वाटत असावे. राज्यात अद्याप पावसाचा हंगाम सुरू आहे. पावसाळ्यात प्रचाराला मर्यादा पडू शकतात. त्यात सध्या सणासुदीचे दिवस आहेत. ऐन सणसमारंभात निवडणुका झाल्या, तर वातावरणनिर्मितीत अडचणी उद्भवतील, असाही एकूणच सूर दिसतो. मुळात महाराष्ट्रातील सरकारबद्दल आज तरी पॉझिटिव्ह वातावरण दिसत नाही. आरक्षणासारख्या प्रश्नांवरून निर्माण झालेले नरेटिही दूर झालेले नाही. त्यामुळे दिवाळीनंतरच निवडणुकीचा धमाका उडणे साह्याभूत ठरू शकते, अशी भावना सत्ताधाऱ्यांमध्ये तयारी झालेली पहायला मिळत आहे. यंदा नोव्हेंबर महिन्याच्या सुरूवातीलाच दिवाळी आहे. नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात दिवाळी संपेल. त्यामुळे विधानसभा निवडणुकीचे मतदान आणि मतमोजणी दिवाळी संपल्यानंतरच होऊ शकते. २६ नोव्हेंबरपूर्वी नव्या विधानसभेची स्थापना होऊ शकते. मात्र, पावसाळा, शेतीची कामे, येणारे विविध सण अशा सगळ्या गोष्टी विचारात घेऊनच आयोगाकडून तारखा जाहीर होण्याची शक्यता संभवते. या पार्श्वभूमीवर सध्या सगळेच पक्ष जागावाटप, उमेदवार निश्चितीसह सर्वच आघाड्यांवर कामाला लागलेले दिसतात.

भाजपाने विधानसभा निवडणुकीची जोरदार तयारी सुरू केली आहे. गणेश चतुर्थीच्या आसपास विविध राज्यांतील उमेदवारीची पहिली यादी जाहीर करून विरोधकांवर आघाडी घेण्याचा पक्षाचा प्रयत्न आहे. मागील वर्षी मध्य प्रदेश, राजस्थान व छत्तीसगड विधानसभा निवडणुकांत ज्या जागांवर पक्षाला पराभव पत्करावा लागला, त्या जागांवर उमेदवारांची लवकर घोषणा करण्याची रणनीती यशस्वी ठरली होती. त्यामुळे महाराष्ट्रासह हरियाणा व झारखंडमध्येही हाच प्रयोग राबविण्याचा भाजपाचा मनसुबा दिसतो. मात्र, येथील स्थिती त्या राज्यांपेक्षा वेगळी आहे, हे लक्षात ठेवावे लागेल. एमपी, राजस्थान व छत्तीसगडमध्ये भाजपाला कुणाच्या सहकार्याची फार गरज नव्हती. महाराष्ट्र व इतर राज्यांमध्ये तशी स्थिती नाही. महाराष्ट्रात शिंदेसेना व राष्ट्रवादी दादा गटाशी चर्चा करूनच भाजपाला जागा वाटप करावे लागेल. लोकसभेत जागा वाटपाच्या घोळाचा भाजपाला मोठा फटका बसला होता. हे लक्षात घेऊन मागच्या काही दिवसांपासून भाजपाचे वरिष्ठ नेते व एकनाथ शिंदे व अजितदादांमध्ये चर्चेच्या फेऱ्या सुरू असल्याचे दिसून येते. त्यातून जागा वाटपाचा तिढा सुटण्याची नक्कीच अपेक्षा असेल. महाराष्ट्राच्या राजकारणात शरद पवार व उद्धव ठाकरे यांनीही आपला प्रभाव टिकवून ठेवला आहे. काँग्रेसचा परफॉर्मन्सही सुधारला आहे. त्यामुळे केवळ दोन, तीन लोकप्रिय योजनांच्या बळावर सरकार निवडून आणणे, महायुतीसाठी सोपे नसेल. हरियाणात सध्या भाजपाचेच सरकार आहे. मागच्या काही दिवसांत या राज्यामध्येही वेगवान घडामोडी घडल्या आहेत. त्यात शेतकऱ्यांमध्येही नाराजी आहे. हे लक्षात घेता पुन्हा सरकार आणण्याचे चॅलेंज स्वीकारावे लागेल. झारखंडमध्ये हेमंत सोरेन यांचे सरकार आहे. सोरेन यांचा झारखंड मुक्ती मोर्चा व काँग्रेस आणि भाजपा यांच्यात प्रमुख लढत असेल. मागच्या काही दिवसांमध्ये झारखंडमध्येही बऱ्याच उलथापालथी झालेल्या आहेत. त्या पार्श्वभूमीवर लोकांचा कल नेमका कसा राहतो, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल. दुसरीकडे जम्मू-काश्मीरमधील निवडणुकांबाबत जोरात चर्चा सुरू आहे. दिवसेंदिवस नंदनवनातील वातावरण बिघडत आहे. दहशतवादी कारवाया वाढल्या आहेत. हे बघता अशांत काश्मीरमध्ये निवडणुका घेणे, हे आव्हानात्मक राहील. यंदाच्या लोकसभा निवडणुकीत भाजपाने वैयक्तिकरीत्या ३७० जागांचे लक्ष्य ठेवले हेते. मात्र, पक्षाला २७२ चा आकडाही गाठता आला नाही. त्यामुळे टीडीपी, संयुक्त दल व अन्य मित्र पक्षांच्या बळावर एनडीएचे सरकार अस्तित्वात आले. दुसरीकडे इंडिया आघाडीने मात्र आश्वासक कामगिरी केली. याचा विचार करता चार राज्यांतील निवडणुका सत्तेवरील पकड मजबूत करण्यासाठी महत्त्वाच्या असतील.

## पांदण रस्ता सिंचन विहिरीत झालेल्या भ्रष्टाचाराच्या चौकशीसाठी उपोषण

जालना । प्रतिनिधी

**जालना पंचायत समिती मार्फत म.ग्रा.रो.ह.यो अंतर्गत पांदण रस्ते, शेततळे व सिंचन विहिरीमध्ये अनियमितता, गैरप्रकार करुन भ्रष्टाचार केल्याप्रकरणी संबंधितावर कायदेशीर कार्यवाही करण्यासाठी १४ ऑगस्टपासून उपोषण सुरू करण्यात आले याप्रकरणी जालना पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री पवार यांना विचारले असता ते म्हणाले की नियमाप्रमाणे चौकशी सुरू असून चौकशीमध्ये जे निष्पन्न होईल त्यांच्या विरोधात कारवाई करण्यात येईल असे श्री श्री पवार यांनी सांगितले ज्यांनी भ्रष्टाचार केला त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल असे गटविकास अधिकारी श्री पवार यांनी सांगितले.**




याप्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. यांनी चौकशी समितो गठित करुन चौकशी आज पर्यंत आली नाही असे उपोषण करते वाघमारे यांचे म्हणणं आहे. म.ग्रा.रो.ह.यो अंतर्गत पांदण रस्ते, शेततळे व सिंचन विहिरीमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता, गैरप्रकार करुन कोटयावधी रुपयांचा भ्रष्टाचार केल्या प्रकरणी दोषींवर कार्यवाही करणे करिता तक्रार दाखल असताना सदरील प्रकरणात कोणतीही उचित कार्यवाही झाली नसल्यामुळे जि.प. समोर बेमुदत आमरण उपोषण सुरू केले आहे. सदस्यीय समिती गठित करुन चौकशी करून ७ दिवसात अहवाल सादर आदेश दिलेले आहेत. परंतु अद्याप पर्यंत चौकशी झाली नाही. उपरोक्त विषयी आपल्या स्तरावर तात्काळ कार्यवाही करुन संबंधितांवर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. पं.स.जालना म.ग्रा.रो.ह. यो अंतर्गत झालेल्या कामांमध्ये अनियमितता, गैरप्रकार व भ्रष्टाचाराची तात्काळ चौकशी करुन संबंधितांवर निलंबनाची कार्यवाही करण्यात यावी. करता १४/०८/२०२४ रोजी जि.प. कार्यालया समोर बेमुदत आमरण उपोषण सुरू केले आहे

## कास्ट्राईबचे जिल्हा कचेरीसमोर धरणे आंदोलन आणि मुख्यमंत्र्यांना पाठविले निवेदन

जालना । प्रतिनिधी

**मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना पदोन्नतीमधील आरक्षण तात्काळ लागू करावे, या सह विविध मागण्यांबाबत कास्ट्राईब कर्मचारी महासंघाच्या वतीने जिल्हाध्यक्ष विनोद भगत यांच्या नेतृत्वाखाली मंगळवारी ( ता.१३) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले.**



सकाळी ११ वा. धरणे आंदोलनास प्रारंभ झाला. , युवा नेते अक्षय गोरंट्याल यांनी आंदोलन स्थळी भेट देऊन पाठिंबा दर्शवला.आंदोलनात जिल्हाध्यक्ष विनोद भगत, जिल्हा सरचिटणीस विलास कोमटवार, राजेश सदावर्ते ,पंजाब खिल्लारे , राजेंद्र शिंदे, रवींद्र मगरे, संजय चव्हाण ,सनी कटकम, गजानन मगर ,अनिल भेरे, गोविंद इंगळे, नितीन श्रीमंगले, आबेद कुरेशी, राजू पवार ,राम पवार ,रंजना मालेवाड, मीना जाधव ,रेणुका बोधुल, राहुल लालझरे ,रामेश्वर कुबेर ,सचिन साळवे, अनिल एडके, रामेश्वर जावळे, प्रदीप पाचपोहे ,मुकुंद महाजन, पारस अहम महिंद्रकर ,एस.जी.आडणे, रमेश पैठणकर, ए.पी.दांडगे, श्रीराम कोकाटे, नरेंद्र जोशी ,पी.आर.गायकवाड, संजय सिंगल, मोहन कदम ,एस.डी.सोनवणे, मंगेश देशपांडे ,आशा आढाव, गणेश पोटे ,संगीता फुलारी, आर. जे. चव्हाण, एस. एस. दाणेकर ,डि.एन.खलसे, एम.पी .जाधव, ए. आर. जाधव ,एस.पी .बाविस्कर ,एस.एस. अंभुरे, व्ही. एस .घनवटे ,एम.एस .घुले, एस .एस.पारवे ,एम .आर .जाधव, पी. एम .उल्लेवाड ,जी.एस.मगर, आदींनी सहभाग नोंदवला. यावेळी कर्मचाऱ्यांनी अप्पर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार यांची भेट घेऊन त्यांच्यामार्फत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना संघटनेच्या वतीने निवेदन पाठवण्यात आले. सामान्य प्रशासन विभागाने दि. ०७ मे २०२१ च्या शासन निर्णयानुसार मागासवर्गीयांच्या पदोन्नत्यांना अडथळा निर्माण केला असून भारतीय संविधानातील तरतुदीनुसार अनुसूचित जाती ,जमाती, इतर मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना पदोन्नती, सरळ सेवा भरती मध्ये दिलेल्या सवलतीस अनुसरून सर्वोच्च न्यायालयाने पदोन्नती रोखता येणार नाही असे स्पष्ट निर्देश दिलेले असतांनाही महाराष्ट्र शासनाने अद्याप पदोन्नती बाबत निर्णय घेतला नाही. आरक्षणाची रिक्त पदे न भरणे हे संविधान विरोधी असून राज्यात कंत्राटी भरती धोरण अमलात आणल्यामुळे लाखो बेरोजगारांमध्ये शासनाप्रती असंतोष निर्माण झाला आहे. असे नमूद करत कंत्राटी नोकर भरती धोरण रद्द करून सरळ सेवा भरती मधील मागासवर्गीयांचा अनुशेष भरून काढावा, जुनी पेन्शन योजना लागू करावी अशा मागण्यांचा निवेदनात समावेश आहे. मागण्या मान्य न झाल्यास मुंबई येथील आझाद मैदानावर आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला .

## प्लॉटचे पैसे देतो म्हणून बोलावून केली जबर मारहाण

### संभाजीनगर पोलिसात दोघांवर गुन्हा दाखल

परळी । प्रतिनिधी

**प्लॉटचे पैसे हिशोब करून देतो असे सांगून परळीच्या हिंद नगर येथील दुकानात बोलावून एकास त्याच्या बहिणी सोबत जबर मारहाण करून जखमी केल्या प्रकरणी परळी येथील संभाजीनगर पोलिसात दोघांवर गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास संभाजीनगर पोलीस करीत आहेत.**

संभाजीनगर पोलिस ठाण्याकडून प्राप्त माहिती अशी की, तक्रारदार नशीर नजीर शेख यांनी पोलिसांना माहिती दिली की त्यांना एक भाऊ नामे समीर व बहीण असिफा अब्दुल खान अशी त्यांची नावे आहेत. अशी काही परळी वैजनाथ येथे तिच्या कुटुंबासह राहते याच गावात आजोबांनी प्लॉट घेतलेला होता वेट मॉलला मज्जिद शेजारी तो प्लॉट माझे वडील तुराब खदीर शेख याला एक वर्षांपूर्वी विक्री केला वडिलांनी त्यांना खरेदीखत करून दिलेले आहे त्यानंतर आठ दिवसांनी माझे वडील मरण पावले वडिलांनी तुराभसेक याचे कडे प्लॉटचे दीड लाख रुपये येणे बाकी असल्याचे मला वेळोवेळी सांगितले होते. त्यामुळे मी तुराभ शेख याला संपर्क करून पैसे मागत होतो. परंतु त्याने पैसे देण्यास टाळाटाळ केली. दि. १३ ऑगस्ट रोजी परळी येथे माझ्या कामानिमित्त आलो असता दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास तुराब शेख याने मला त्याच्या दुकानात बोलावून घेतले. हिंदनगर येथील दुकान वर पोहोचताच तुराब शेख व त्याचा मेहुना अन्वर मन्सूर खान दोघे राहणार परळी यांनी हातात लाकूड घेऊन मला व माझ्या सोबत असलेली बहीण असिफा अफजलखान हीच मारहाण करून माझ्या हातावर पायावर जबर मुकामार दिला. त्यावेळी तुराभ खदिर शेख याने त्याच्या दुकानातून तलवारी सारखा धारदार कोयता घेऊन माझ्या अंगावर मारण्यासाठी धावत आला होता. परंतु अर्षद अफजलखान, अल्ताफ अफजल खान व इतरांनी भांडणाची सोडवा सोडवा केली. या प्रकरणी नसीर नजीर शेख वय ३९ रा. ठाणे यांच्या फिर्यादीवरून संभाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर १२७/२०२४ भारतीय न्याय साहिता कलम ११८ (१) ३५२, ३५१(२) ३ (५)४ सशस्त्र अधिनियम १९५९, २५ नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास संभाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक चंद्रया आईटवार हे करीत आहेत.




**बीड : येथे नवीन बदली होऊन आलेले बीड जिल्हा पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांचे स्वागत करताना ॲड.राजु शिंदे बीड युवा मल्हार सेना महाराष्ट्र राज्य**

## धडाकेबाज कारवाई करणारे पो.नि.नाचन यांची बीडला बदली

अंबड । प्रतिनिधी

**संभाजीनगर परिक्षेत्रातील सहा पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्या असून यामध्ये अंबडचे पोलीस निरीक्षक श्री रघुनाथ नाचण यांनी वर्षभरामध्ये गुन्ह्याचा प्रमाण कमी करून इतर गुन्हा मध्येधडाकेबाज कारवाई त्यांनी केली होती तसेच गुटखा कारवाई मध्ये दोन कॅन्टर अंबड पोलीस ठाण्यात जप्त करण्यात आली आहे. पोलीस निरीक्षक रघुनाथ नाचन यांची आता बीड येथे बदली झाली आहे. तसेच घनसावंगीचे पोलीस निरीक्षक मजहर सय्यद यांचीही बीडला झाल्याचे समजते.**

अँटीह्युमन ट्रॅफिकिंग युनिटच्या उपनिरीक्षक मनीषा गिरी यांचीही बदली करण्यात आली. छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्रातील चार पोलीस निरीक्षक आणि दोन पोलीस उपनिरीक्षक यांच्या बदल्या करण्यात आल्या आहे. यासंदर्भात विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र यांनी हे बदल्याचे आदेश निर्गमित केले आहेत. बीड येथील पोलीस निरीक्षक केतन राठोड यांची जालन्यात बदली करण्यात आली आहे . तसेच, बीड येथे कार्यरत असलेले पोलीस निरीक्षक मनीष पाटील यांची धाराशिव येथे बदली करण्यात आली आहे तर जालना येथील अँटी ह्युमन ट्रॅफिकिंग युनिटच्या पोलीस उपनिरीक्षक मनीषा गिरी यांची बीडला बदली झाली आहे, तर संभाजीनगर ग्रामीणचे पोलीस उपनिरीक्षक गणेश जांभळे यांची धाराशिव येथे बदली करण्यात आली आहे.

## शिवस्वराज्य यात्रा आज बीडमध्ये कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे-आ.संदीप क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

**शिवनेरी किल्ल्याहून निघालेली शिवस्वराज्य यात्रा गुरुवारी (दि.१५) रोजी बीड येथे येणार असून शहरातील आशीर्वाद लॉन्स येथे सभा होणार आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रमुख नेते उपस्थित असणार आहेत. या सभेसाठी बीड विधानसभा मतदारसंघातील कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.**



महायुती सरकारच्या काळ्या कारनाम्यांचा जणतेसमोर पर्दाफाश करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाकडून, छत्रपती शिवाजी महाराजांची जन्मभूमी शिवनेरी किल्ल्याहुन दि.९ ऑगस्ट रोजी जागतिक आदिवासी दिन आणि 'चले जाओ' चळवळीची सुरुवात दिलेल्या दिनाचे औचित्य साधून शिवस्वराज्य यात्रेला सुरुवात करण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यात महाराष्ट्रातील ७ जिल्ह्यांमधून हि शिवस्वराज्य यात्रा जाणार आहे. गुरुवारी (दि.१५) रोजी बीडमध्ये हि यात्रा येणार असून, शहरातील आशीर्वाद लॉन्स येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रमुख नेते यांच्या उपस्थित सभा होणार आहे. दरम्यान महाराष्ट्रावर दिल्लीकडून होत असलेला अन्याय, राज्यात सुरु असलेली राजकीय अराजकता थांबवण्यासाठी आपले आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा आदर्श जगावं हि काळाची गरज आहे. यासाठी गुरुवारी (दि.१५) रोजी सायंकाळी ५ वा. बीड मतदारसंघातील पक्षाचे कार्यकर्ते व पदाधिकारी यांनी शिवस्वराज्य यात्रेत सहभागी होण्यासाठी उपस्थित राहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष व बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

## पान १वरून...

### यंदा गोगलगायीचे

प्रभावी उपाययोजना करण्याबाबत सूचना दिल्या आणि कृषी विभागाने याची दखल घेत राज्य पुरस्कृत सोयाबीन व इतर तेलबिया उत्पादकता वाढ आणि मूल्य साखळी प्रकल्पाअंतर्गत राज्यांमध्ये २८ जिह्यामध्ये २५० मे.टन मेटाल्डिहाईड या गोगलगाय नाशकाचा पुरवठा करण्यात आला. त्यामुळे यंदाच्या खरीप हंगामामध्ये या बाबीची प्रभावी आणि काटेकोर अंमलबजावणी करण्यात आली. त्याचाच परिणाम म्हणून २०२४ च्या खरीप हंगामामध्ये गोगलगायीचा प्रादुर्भाव पूर्ण नियंत्रणात आणला गेला.

------------

### लाडक्या बहिणीचा

आधार कार्डशी लिंक नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे त्या महिला वंचित राहू शकतात. सरकारने अशा लाभार्थ्यांना १७ ऑगस्टपर्यंत खाते लिंक करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. लाभार्थी महिलांच्या खात्यात पैसे टाकण्यास सुरुवात झाली आहे. आता तुम्ही विरोधकांना विचारा त्यांच्याकडे काय उत्तर आहे? माझ्या लाडक्या बहिणींना आधीपासून सांगतोय की, या सावत्र भावांपासून सावध राहा. तुम्हाला पैसे मिळू नयेत म्हणून हायकोर्टात देखील गेले आहेत. त्यांना हायकोर्टाने देखील फटकारले आहे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे काय म्हणाले आहेत. १७ तारखेला आमच्या लाडक्या बहिणींच्या खात्यात जुलै आणि ऑगस्टचे दोन हफ्ते जातील.

-----------

### राहुल नवीन यांची

आणि उत्कृष्ट ट्रॅक रेकॉर्ड असलेली व्यक्ती आहे. याआधी राहुल नवीन यांनी ईडीमध्येच अनेक महत्त्वाच्या पदांवर काम केले आहे. आर्थिक गुन्हे आणि मनी लॉंड्रिंगशी संबंधित अनेक प्रकरणांच्या तपासात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. यासोबतच ईडीचे विशेष संचालक म्हणून त्यांनी अनेक मोठ्या प्रकरणांच्या तपासातही मोठी भूमिका बजावली आहे. बिहारचे रहिवासी असलेले नवीन हे १९९३ च्या बॅचचे आयआरएस अधिकारी आहेत. याआधी त्यांची ईडीचे प्रभारी संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी ईडीमध्ये मुख्य दक्षता अधिकारी म्हणूनही काम केले आहे. नोव्हेंबर २०२० मध्ये त्यांची ईडीचे विशेष संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर नोव्हेंबर २०१९ पासून ते या पदावर कार्यरत आहेत. नवीन यांना २०१७ मध्ये आयकर आयुक्त बनवण्यात आले होते.

---------------

### शासनाने शेतकऱ्यांच्या

वानखेडे, खा. प्रतिभा धानोरकर, अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष वजाहत मिर्झा, एस. सी. विभागाचे अध्यक्ष सिद्धार्थ हत्तीअंबिरे, माजी मंत्री डॉ. सुनिल देशमुख, अनिस अहमद, प्रा. वसंत पुरके, माजी आमदार विरेंद्र जगताप, अमरावती शहराध्यक्ष बबुल शेखावत, जिल्हा अध्यक्ष अनिरुद्ध ऊर्फ बबलु देशमुख आदी उपस्थित होते. विधिमंडळ पक्ष नेते बाळासाहेब थोरात यावेळी म्हणाले की, लोकसभेत काँग्रेस पक्षाची कामगिरी सुवर्णाक्षरांनी लिहावी अशी झाली आहे आता विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचे यश दिमाखदार असले पाहिजे. महायुती सरकार बेकायदेशीर आहे. न्यायालतील निकाल वेळेवर लागला असता तर सरकारचाच निकाला लागला असता. महायुती सरकारच्या भ्रष्टाचारावर विधानसभेत काँग्रेसने आवाज उठवला पण सरकारने उत्तर दिले नाही. आता या सरकारच्या भ्रष्टाचाराची पोलखोल जनतेत जाऊन करू. यावेळी बोलताना अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस मुकुल वासनिक म्हणाले की, काँग्रेस पक्ष सर्वधर्मसमभाव माननारा आहे पण आरएसएसचा सर्वधर्म समभावावर विश्वास नाही, त्यांचे स्वयंसेवक संविधान मानत नाहीत पंतप्रधान हे ही स्वयंसेवक आहेत. लोकसभेत बहुमत नसल्याने भाजपा सध्या राज्यघटना बदलू शकत नाही पण हा धोका टळलेला नाही असा इशारा वासनिक यांनी दिला. मध्य प्रदेश, छत्तीसगड, बिहारमध्ये अपेक्षित यश मिळाले असते तर एनडीएचे सरकार आलेच नसते. विधानसभा निवडणुकीत आता एकत्र येऊन संपूर्ण ताकदीने महायुतीला पराभूत करण्यासाठी कामाला लागा. विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार, विधान परिषदेतील काँग्रेस पक्षाचे गटनेते सतेज ऊर्फ बंटी पाटील, माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनीही यावेळी राज्यातील सरकारवर चौफेर टीका करत राज्यात परिवर्तन करून महाविकास आघाडीचे सरकार आणण्याचे आवाहन काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांना केले.

---------

### मी कर्जबाजारी झाल्याने

भगवान अवचार यांना दिला. मुलगा सागर याची आम्ही थर्मल कॉलनी व परीसरात त्याच्या मित्राकडे शोध घेतला. परंतु तो मिळुन आला नाही. त्याचे वर्णन खालील प्रमाणे आहे. उंची ५ फुट ५ ईंच, रंग सावळा, केस समोरच्या बाजुस टकल पडलेले काळे बारीक, अंगात टी शर्ट, पॅन्ट काळ्या रंगाची, शिक्षण , मो नं. ८६००८२७६७९ अँन्ड्रॉईड मोबाईल आहे. वरील वर्णनाचा इसम अशोक नगर ता परळी येथुन राहत्या घरातुन कोणास काही एक न सांगता निघुन गेला असून कोणाला आढळून आल्यास संभाजीनगर पोलीस ठाण्याचे संपर्क साधावा असे आवाहन पोलिसांच्या वतीने करण्यात आले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पो.ह. नरहरी नागरगोजे हे करीत आहेत.

----------

### केजरीवाल यांची

रोजी ठेवली आहे. मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या वतीने ज्येष्ठ वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी सर्वोच्च न्यायालयात बाजू मांडली. सिंघवी म्हणाले की, केजरीवाल यांना ईडीच्या प्रकरणात अंतरिम जामीन मंजूर करण्यात आला आहे. प्रकृतीचे कारण सांगून त्यांनी तात्काळ अंतरिम जामीन देण्याची मागणी केली, जी सर्वोच्च न्यायालयाने नाकारली. यावेळी आपण अंतरिम जामिनाचा विचार करणार नसल्याचे न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी सांगितले.

----------

### महाराष्ट्रातील तीन पोलीस

१७ अधिकाऱ्यांना पोलीस शौर्य पदक तर ९ कर्मचाऱ्यांना पोलीस पदक प्रदान करण्यात आले.

-----------

### पालकमंत्री अतुल सावे

अंतर्गत मोबाईल व्हॅनला झेंडा दाखविण्याच्या कार्यक्रमास उपस्थिती. सकाळी ९.४० वा. जिल्हा नियोजनच्या नवीन इमारत बांधकामास ते भेट देतील. सकाळी ९.५० वा. परेड मैदान, पोलीस अधीक्षक यांच्या कार्यक्रमास ते उपस्थित राहणार आहेत. सकाळी १०.०५ वा. जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित महसूल पंधरवडा समारोप कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत. सकाळी ११.०० वा. जालना येथून वाहनाने छत्रपती संभाजीनगरकडे ते प्रयाण करतील.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार दि. १५ ऑगस्ट २०२४
३

## मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची आढावा बैठक नाईकवाडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न

बीड : जिल्ह्यात सर्वाधिक लाभार्थ्यांचे ६८६६५ अर्ज हे बीड तालुक्यातून आले. ज्यापैकी ६६९७५ अर्ज मंजूर करण्यात आले असून ८३ अर्ज नामंजूर झालेले आहेत. अर्जातील त्रुटीमुळे १५१६ अर्ज तात्पुरते नामंजूर करण्यात आले आहेत. त्रुटीमुळे तात्पुरते ना मंजूर करण्यात आलेल्या अर्जांबाबत शासन स्तरावर पाठपुरावा करून त्याा लाभार्थ्यांना लाभ मिळवून देण्यासाठी बीड विधानसभा क्षेत्र समिती प्रयतशील असेल. आजच्या आढावा बैठकीत समितीचे सदस्य सचिव तहसीलदार श्री चंद्रकांत शेळके यांच्यासह शासकीय सदस्य, अशासकीय सदस्य तथा शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळक, सचिन जाधव, पालिका गटनेते फारुख पटेल, नगरसेवक सर्वश्री प्रभाकर पोपळे, भैय्यासाहेब मोरे, गणेश तांदळे आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ बीड विधानसभा क्षेत्रातील अंतिम घटकातील बहिणींपर्यंत पोहोचवण्याकरिता तहसील कार्यालयाबाहेरच्या प्रांगणात मंडप टाकून लाभार्थ्या बहिणींसाठी मदत केंद्र सुरू करण्यात येत आहे. ज्याचा शुभारंभ उद्या दिनांक १५ ऑगस्ट रोजी सकाळी ९:०० वाजता बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. धनंजयजी मुंडे साहेब यांच्या शुभहस्ते होणार आहे.

# मराठ्यांच्या वाघाला साथ देणारा शिलेदार प्रदीप दादा सोळुंके

## प्रदीप दादांच्या हिरक महोत्सवाला स्वातंत्र्यदिनी लाभणार जरांगे पाटलांची उपस्थिती

**वडवणी । प्रतिनिधी**

साडेतीनशे वर्षांपूर्वी कोणत्याही सुविधा नसताना कोणतेही पाठबळ नसताना वाहतुकीचे साधने अपुरे आणि मोजकेच मावळे सोबत असतानाही सह्याद्रीच्या दऱ्या खोऱ्यात रानोमाळ फिरुन स्वराज्याची निर्मिती करण्याचे स्वप्न छत्रपती शिवरायांनी मूठभर मावळ्यांच्या पाठबळावर शक्य करून दाखवले.जे अशक्य आहे ते शक्य करण्याची ताकद फक्त छत्रपती शिवाजी महाराजांमध्येच पाहायला मिळाली आणि तीच ताकद घेऊन आता पुन्हा एकदा महाराष्ट्राचा ढाण्या वाघ सर्वसामान्य शेतकरी शेतमजुरांच्या मुलांना त्याांच्या हक्काची भाकर मिळवून देण्यासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात स्वतःच्या जीवाची बाजी लावून अहोरात्र मेहनत घेत आहे. या मराठा योद्धाला साथ देण्यासाठी अनेक मावळे आज अहोरात्र मेहनत घेत आहेत. या मावळ्यांमध्ये सर्वात अग्रगण्य नाव म्हणजे ज्येष्ठ व्यक्तिमत्व महाराष्ट्रात आपल्या कर्तृत्वाने मागील ३५ वर्षापासून ज्यांनी नावलौकिक केलं ते ख्यातनाम लेखक, कवी, वक्ते, कीर्तनकार आणि निष्ठावंत वारकरी... मराठा योद्धा मनोज जरांगे पाटलांचे निष्ठावंत सहकारी प्रदीप दादा सोळुंके यांचा आज स्वातंत्र्यादिनी हिराक महोत्सवी वाढदिवस आहे. या वाढदिवसाला मराठ्यांचं दैवत मराठा योद्धा मनोज दादा जरांगे पाटील उपस्थित राहणार आहेत. आपल्या लाडक्या ज्येष्ठ सहकाऱ्याचे कौतुक आणि अभिनंदन करण्यासाठी मनोज दादा आज स्वातंत्र्या दिनी माजलगावात येणार असून याप्रसंगी लाखो मराठा मावळेही उपस्थित राहणार आहेत. हा सोहळा डोळे दिपवणारा होणार असल्याने प्रदीप दादा सोळंके यांच्या जीवनातील सर्वात आनंदमय क्षण असणार आहे.

मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील मराठ्यांची न्याय्य मागणी घेऊन मागील अनेक वर्षापासून संघर्ष करत आहेत. तसे पाहता मनोज जरांगे पाटील यांच्या घरची परिस्थिती अत्यांत हलाखीची आणि नाजूक आहे.



कोणतेही आंदोलन उभं करायचं म्हटलं तर पैसा पाणी, मनुष्यबळ आणि संघटन या गोष्टी महत्वाच्या असतात. मात्र मनोज जरांगे पाटील यांच्याकडे कोणतीही आर्थिक परिस्थिती नाही. कोणत्याही सुविधा नाहीत. साधी स्वतःच्या मालकीची मोटरसायकल देखील नाही. एवढी हालाखीची परिस्थिती स्वतःची दुसऱ्यांचे दुःख दुर करण्यासाठी ते रस्त्यावर पडले. महाराष्ट्रातील सर्वात दुर्लक्षित समाज म्हणून पाहिला जाणारा मराठा समाज... या समाजाला न्याय मिळवून देण्याचं स्वप्न त्यांनी उराशी बाळकलं. कोट्यावधी लोकांचे ५८ मोर्चे महाराष्ट्रात निघूनही या मोर्चांना सही सलामत बगल देऊन सरकार सत्ता भोगत आहे. मराठ्यांच्या डोळ्यात धुळ फेकून सत्ता हस्तगत करणारं हे सरकार जरांगे पाटलांनी सुरवातीच्या काळात आंदोलन सुरू केल्यानंतर पाटलांच्या मूठभर लोकांना किंमत देत नव्हतं. जरांगे पाटील म्हणजे एका खेड्यातील चिल्लर माणूस आणि याला इथेच पायदळी तुडवुन टाकण्याचे सरकारने मनसुबे रचले होते. जरांगे पाटलाच्या आंदोलनाला चिरडून टाकण्याचा प्रयत केला परंतु साडेतीनशे वर्षांपूर्वी मुठभर मावळ्यांना सोबत घेऊन शाहिस्तेखान, अफजलखानाच्या लाखोच्या फौजेला चारी मुंड्या चित करणारे छत्रपती शिवराय आणि त्याांच्याच आदर्शावर चालणारा मनोज जरांगे पाटील नावाचा मावळा शासनाच्या असल्या भ्याड हल्ल्याला भिक थोडीच घालीत असतो. त्यांनी आंदोलन उभे केले आणि शासनाच्या मुंडीवर पाय देऊन राज्यातील समस्त मराठा समाज एका जागेवर आणला. समाजाशी गद्दारी करायची नाही ही प्रतिज्ञा घेऊन रणांगणात उतरलेल्या जरांगे पाटलांच्या निष्ठेमुळे संपूर्ण महाराष्ट्रातील समस्त मराठा समाज मनोज जरांगे पाटील यांच्या पाठीमागे खंबीर उभा राहिला. जरांगे पाटलांनी समाजासाठी कधीही चुकीची तडजोड केली नाही. म्हणून समाजाने जरांगे पाटलाला आपल्या हृदयात जागा दिली. जरांगे पाटलांच्या या महा लढ्यामध्ये खंबीर साथ देणारे मावळेही त्याच ताकदीचे आहेत. जरांगे पाटलाच्या प्रत्येक लढ्यात स्वतःच्या जीवाची पर्वा न करणारे मावळे रात्र दिवस मेहनत घेत आहेत. प्रत्येक आंदोलनामध्ये सहभागी होऊन जरांगे पाटलाचे मनोबल वाढवणे आणि त्यांच्यासाठी अहोरात्र झिजण्याची ताकद असणारे जरांगे पाटलाचे अनेक सहकारी आहेत. त्यापैकी एक म्हणजे प्रदीप दादा सोळंके हे होत. प्रदीप दादा सोळंके हे ज्येष्ठ सहकारी आहेत. मनोज दादा जरांगे पाटील हे त्यांना आदरानं दादा म्हणून हाक मारतात. आज प्रदीप दादा सोळंके यांचा साठावा वाढदिवस म्हणजे हीरक महोत्सवी वाढदिवस आहे. हा सामाजिक उपक्रमाने झाला पाहिजे म्हणून जरांगे पाटील यांच्या उपस्थितीमध्ये माजलगावात ग्रंथ तुला होऊन जरांगे पाटील प्रदीप दादांचं अभिनंदन आणि सत्कार करणार आहे. प्रदीप दादा सोळंके हे राज्यातील मागील ३५-४० वर्षापासून सामाजिक सेवेमध्ये सक्रिय आहेत. त्यांनी विविध संघटनेच्या माध्यमातून समाजसेवेचे काम केलं आहे. आतापर्यंत त्यांचे हजारो व्याख्याने प्रवचने कीर्तने झाले आहेत. त्यांनी शिक्षक, मुख्याध्यापकाची नोकरी ३५ वर्षे करीतच त्याा माध्यमातून त्यांनी विद्यार्थी घडविण्याचे काम करत समाजात जनजागृतीचे काम केलं. विविध पक्ष संघटनेतील नेतेमंडळी सोबत त्यांचे व्यक्तिगत जिव्हाळ्याचे संबंध आहेत परंतु कोणत्याही पक्षासाठी आपली स्वतःची विचारधारा सोडून ते कधीही वागले नाहीत. समाज हित हीच मोठी विचारधारा त्यांनी जोपासली आणि आपलं कार्य अविरतपणे चालू ठेवलं. प्रदीप दादा सोळंके यांचं नाव केवळ महाराष्ट्रापुरतच मर्यादित राहिले नाही. तर देशाच्या कानाकोपऱ्यात त्यांची व्याख्याने झाली आहेत. त्यांना आतापर्यंत अनेक पुरस्काराने गौरविण्यात आला आहे. अनेक नामवंत लेखक कवींनी त्यांचा गौरव केला आहे. राज्य आणि राज्यातील मोठमोठ्या राजकीय सामाजिक न्यायिक क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचा गौरव झाला आहे. म्हणून प्रदीप दादा सोळंके हे समाजातील हिरा म्हणून सर्वपरिचित आहेत. या हिऱ्याचा आज स्वातंत्र्या दिनी साठावा वाढदिवस आहे. एवढ वय झालं तरी मनोज दादा जरांगे पाटील यांच्या मराठा आंदोलनामध्ये प्रदीप दादा सोळंके यांनी ऊन पाऊस वारा याची तमा न बळकता रात्रंदिवस मेहनत घेतली. ज्या ठिकाणी मनोज दादा जरांगे पाटील यांची सभा आहे त्याा सभेच्या अगोदर तीन चार तासांनी जाऊन प्रदीप दादांनी त्याा ठिकाणचे नियोजन बघणं, त्याा ठिकाणी आलेल्या नागरिकांना मार्गदर्शन करणं आणि मनोज दादा जरांगे पाटील यांचे विचार घराघरापर्यंत पोहोचले. एवढ महान कार्य केलं कधीही लहान मोठा असा भेदभाव न करता सर्व मित्र परिवाराला त्यांनी आपल्या लहान भावाची वागणूक दिली. आम्ही देखील मनोज दादा जरांगे पाटील यांच्या दौऱ्यात त्यांच्यासोबत होतो. आमच्यासारख्या सामान्य लोकांनाही अगदी मिळून मिसळून आनंदात सोबत राहून हा लढा कसा पुढे जाईल... मनोज दादा यांनी पाहिलेले स्वप्न साकार करण्यासाठी आपल्यासारख्या मावळ्यांनी मेहनत घेतली पाहिजे असं मार्गदर्शन ते सर्व सहकाऱ्यांना करत असतात. मनोज दादा जरांगे पाटलांनी आपला जीव पणाला लावला आहे. आपण त्यांच्यासाठी किमान वेळ तरी दिली पाहिजे अशी प्रांजळ भावना प्रदीप दादा हे भाषणातुन व्यक्त करत असतात.

# प्रा.ईश्वर मुंडे यांनी वाजवली तुतारी

## गावोगावी जाऊन दिले शिव स्वराज्य यात्रेचे निमंत्रण

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे जन्मस्थळ शिवनेरी येथून निघालेली राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची शिव स्वराज्य यात्रा दि.१६ ऑगष्ट २०२४ शुक्रवारी माजलगाव मतदार संघातील तेलगाव येथे येत आहे.

तेलगाव येथील वृंदावन मंगल कार्यालय येथे सकाळी ११ वाजता आयोजित केलेल्या शिव स्वराज्य यात्रा सभेचे निमंत्रण राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष व महा विकास अघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना देण्याचे काम राष्ट्रवादी काँग्रेस-



शरदचंद्र पवार पक्षाच्या सेवा निवृत्त अधिकारी कर्मचारी सेल चे राज्य प्रमुख तथा महा विकास अघाडी कडून माजलगाव विधान सभा निवडणूक लढवण्यास ईच्छूक असलेले प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे हे स्वत: गावोगावी जाऊन करत आहेत. शिव स्वराज्य यात्रेचे निमंत्रण देण्याचे काम प्रा.ईश्वर मुंडे यांनी स्वत:चे गाव गांजपूर ता.धारूर येथून सुरू केले असून या निमित्त आपले वडील सेवा निवृत्त मुख्याध्यापक आनंदराव मुंडे गुरूजी व आई ग्राम पंचायत सदस्या सौ.सुभद्रा आनंदराव मुंडे यांच्या उपस्थीतीत तुतारी वाजवून केले आहे. या वेळी गांजपूरच्या सरपंच सौ.कस्तूरा पवार, सदस्या सौ.शालूबाई बापूराव पारवे,सेवा सहकारी सोसायटीचे व्हाईस चेअरमन भिमराव डापकर व इतर मान्यवर, पक्षाचे कार्यकर्ते व गावकरी उपस्थीत होते. बीड जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक ते शिक्षण विस्तार अधिकारी पदावर नौकरी केलेल्या प्रा.ईश्वर मुंडे यांनी खा.शरदचंद्र पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून एप्रिल २०१६ ला स्वेच्छा सेवा निवृत्ती घेवून पक्षात धारूर तालुकाध्यक्ष,प्रदेश सरचिटणीस व राज्य प्रमुख पदांवर व सामाजिक कार्यात सक्रीय कार्यरत असलेल्या प्रा.ईश्वर मुंडे यांनी या पुर्वी मराठवाडा विभाग पदवीधर मतदार संघ निवडणूक-२०२१ व बीड लोकसभा मतदार संघ निवडणूक-२०२४ लढवण्याची ईच्छा व्यक्त करून चांगला जन संपर्क ही केलेला होता.त्यांना जनतेची चांगली पसंती ही मिळालेली होती.थोडक्यात संधी हुकलेल्या प्रा.ईश्वर मुंडे यांनी निष्ठेने आपले राजकीय व सामाजीक कार्य चालूच ठेवले. आता परत पुन्हा महा विकास अघाडी कडून माजलगाव विधानसभा निवडणूक-२०२४ लढवण्यास ईच्छूक असलेल्या प्रा.ईश्वर मुंडे यांनी विविध प्रसंग व विविध मार्गांनी जन संपर्क वाढवण्यावर भर दिलेला असून अभ्यासू ,उच्च शिक्षीत,स्वच्छ प्रतिमा,नवीन चेहरा व प्रशासनाचा अनुभव असल्याने त्यांना जनतेची पसंती मिळताना ही दिसत आहे. या वेळी तरी महा विकास आघाडीकडून खा.शरदचंद्र पवार हे प्रा.ईश्वर मुंडे यांच्या हाती तुतारी देतील काय ? या प्रश्नाच्या उत्तराची उत्सूकता मतदार संघातील जनतेला लागलेली आहे.




## मुप्टा जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल शिरसमार्ग येथे शरद मगर यांचा सत्कार

**बीड । प्रतिनिधी**

मुप्टा शिक्षक संघटना बीड जिल्हा जिल्हाध्यक्षपदी शरद दुष्यंत मगर यांची निवड झाल्याबद्दल श्री समर्थ शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने संस्थेचे सचिव मा सुभाषराव पवळ व समर्थ विद्यालय शिरसमार्ग शाळेतील सर्व कर्मचारीच्यावतीने यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे सचिव मा.सुभाषराव पवळ माजी मुख्याध्यापक मोहनराव पवळ,भारत तांबारे,भारत मगर ,बेद्रे सर काशीद सर ,दाभडगावकर सर शिंदे सर ,आहेर सर जमदाडे सर टाकसाळ सर,कारंडे सर कात्रजकर सर ,खोसे सर, सचिन रडे ,बाबु रडे ,अशोक चिखले यांची उपस्थिती होती.

## मिनी मॅरेथॉनसाठी राष्ट्रीय कॅडेट कोअर तसेच इतर विद्यार्थ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

राज्यात उद्भवणाऱ्या विविध आपत्ती संदर्भात रॅली मॅरेथॉनच्या माध्यमातून जनजागृती करण्यासाठी मे. चौरंग ३, युनायटेड आऊस, मनमाळा टैंक रोड, माहिम मुंबई-१६ या संस्थेमार्फत बीड येथे जिल्हा स्तरावर दिनांक १९ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ०७.०० वा. रॅली / मिनी मॅरेथॉन कार्यक्रमाचे आयोजन स्थळः अंबिका चौक, बीड ते संत सेवालाल महाराज चौक, रिलायंस पेट्रोल पंपाजवळ, बीड या ठिकाणी करण्यात येणार आहे.

या मिनी मॅरेथॉनमध्ये सहभाग नोंदविणाऱ्या प्रथम १०० ते १५० स्पर्धकांसाठी संस्थेमार्फत टी-शर्ट, कॅप्स, स्नॅक्स (पाणी, केळी, बिस्किटे) वितरीत करण्यात येणार आहे तसेच पहिल्या ३ विजेत्यांना पदकांचे वितरण करण्यात येणार आहे. तरी सदरील मिनी मॅरेथॉनसाठी राष्ट्रीय कॅडेट कोअर विद्यार्थी (एनसीसी), राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी (एनएसएस), आपदा मित्र, होमगार्ड व स्काऊट गाईडचे विद्यार्थी यांना सहभागी होण्याचे आवाहननिवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, बीड यांनी केले आहे.

सदरील मिनी मॅरेथॉनसाठी स्पर्धकांनी नावनोंदणी अनिकेत काळे, जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालय, बीड (मो.क्र. ९६०४९५९६७८) यांचेकडे दि. १८ ऑगस्ट २०२४ रोजी सायं. ०५.०० वाजेपर्यंत करण्यात यावी.

## आ.सुरेश धस यांच्या प्रयत्नाने आठेगावपुट्ठा वस्ती रस्त्याच्या कामास सुरुवात

**आष्टी । प्रतिनिधी**

तालुक्यातील कऱ्हेवडगाव नजिक असलेल्या आठेगावपुठ्ठा वस्तीचा रस्त्याचा गेल्या चाळीस वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न मार्गी लागला आहे. माजी मंत्री सुरेश धस व सरपंच वंदना गायकवाड यांनी यासाठी पुढाकार घेतला असून रस्त्याच्या कामास सोमवारी (ता. १२) सुरवात करण्यात आली आहे.

तालुक्यातील क-हेवडगाव गावाच्या अंतर्गत असलेल्या आठेगावपुठ्ठा वस्ती येते. या वस्तीला जाण्यासाठी असलेला रस्त्याची गेल्या ४० वर्षांपासून



अतिशय दयनीय अवस्था झाल्याने शेतकरी, दुग्ध व्यावसायिक व शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना जाण्यायेण्यासाठी मोठी कसरत करावी लागत होती. रस्ता नसल्याने वाहने शेतात जात नसल्याने शेती करणे अतिशय कठीण बनले होते.

आठेगावपुठ्ठा वस्ती रस्त्याचे काम करावे, यासाठी स्थानिक प्रशासन व अधिका-यांकडे करूनही रस्त्याचे काम नसल्याने ग्रामस्थांना मोठ्या हालअपेष्टांचा सामना करावा लागत होता. पावसाळ्याच्या दिवसांत तर विद्यार्थ्यांना गुडघाभर चिखलातून जावे लागत होते.

ही बाब माजी मंत्री सुरेश धस यांच्या कानावर गेल्यानंतर त्यांनी तातडीने क-हेवडगाव येथील आठेगावपुठ्ठा वस्ती रस्ता व गावातील इतर रस्त्यांची पंचायत समितीतील बांधकाम विभागाचे अधिकारी व कऱ्हेवडगावच्या सरपंच वंदना गायकवाड यांच्यासह पाहणी करून शेतक-यांशी संवाद साधत रस्त्याचे काम सुरू करण्याच्या सूचना केल्या.

यानंतर अवघ्या आठ दिवसांत सरपंच वंदना गायकवाड नवनाथ नागरगोजे, केशव बांगर, श्रीधर खांडवे, आजिनाथ विधाते, बलभीम विधाते, हनुमान गायकवाड, गहिनीनाथ नागरगोजे, बाप्पू नागरगोजे, सोमनाथ नागरगोजे, आत्माराम नागरगोजे, रामभाऊ नागरगोजे, ब्रह्मदेव नागरगोजे, प्रवीण गायकवाड, राजेंद्र बोराडे, रावसाहेब नागरगोजे, गणेश नागरगोजे, अजिनाथ नागरगोजे, युवराज खाडे व ग्रामस्थांच्या उपस्थितीत रस्त्याच्या कामाचा शुभारंभ करून काम सुरू करण्यात आले आहे. गेल्या चार दशकांपासून प्रतिक्षेत असलेले रस्त्याचे स्वप्न साकार झाल्याने ग्रामस्थांमधून समाधान व्यक्त होत आहे.

## संस्कार लाड सामाजिक उपक्रमाने वाढदिवस साजरा करणार

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी शहरातील छत्रपती शाहू महाराज निवासी दिव्यांग विद्यालयात दिव्यांग व निराधार विद्यार्थ्यांना शालेय साहित्या व खाऊचे वाटप करुन शुक्रवार दि. १६ आगस्ट २०२४ रोजी १८ वा वाढदिवस संस्कार राजेंद्र लाड साजरा करणार आहे. या दिवशी संस्कार लाड हा कसलाही सत्कार, शाल, श्रीफळ, हार न स्विकारता दिव्यांग बांधवांना शालेय साहित्या व खाऊचे वाटप करणार असून ही वडलोपार्जित परंपरा कायम सुरु ठेवणार आहे. तसेच संस्कार लाड हा सामाजिक भान राखून मागील दोन वर्षापासून सातत्याने सामाजिक उपक्रमाने वाढदिवस साजरा करत आहे.

आपण ही समाजाचे काही तरी देणे लागतो, या उद्दात हेतूने संस्कार लाड हा समाजसेवा करत आहे. समाजसेवेचा वारसा त्याने आपल्या वडिलांकडून घेतलेला आहे.



त्याचे वडिल राजेंद्र लाड हे राज्यपुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक असून ते नेहमीच शैक्षणिक, सामाजिक, राष्ट्रीय, धार्मिक, साहित्या व दिव्यांग क्षेत्रातील कार्यात सततच अग्रेसर असतात. त्यांचाच वारसा घेवून संस्कार लाड हा ही त्यांच्या पावलावर पाऊल टाकून सामाजिक कार्य करत असतो. संस्कार हा त्याच्या वाढदिवसानिमित्त वायफट खर्च न करता अनाथ, मतिमंद, दिव्यांग निवासी शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे व खाऊचे वाटप करुन मित्र परिवार, बालगोपाळ यांच्या उपस्थितीत वाढदिवस साजरा करणार आहे. सध्या सर्वत्र धुमधडाक्यात वाढदिवस साजरा करण्याची क्रेझ निर्माण झाली आहे. लहान मुलांपासून ते मोठ्या व्यक्तींपर्यंत सर्वांचेच वाढदिवस अतिशय धुमधडाक्यात केले जात आहेत. यासाठी मोठा खर्च करण्यात येत आहे. अतिरेकी सजावट, फटाके वाजवणे, डिजे असा खर्च करण्याची सध्या चढाओढ निर्माण झाली आहे. मात्र सामाजिक आत्मभान ठेवून सामाजिक उपक्रम राबवून वाढदिवस साजरा करणे प्रमाण कमी झाले आहे. माझा प्रत्येक वाढदिवस समाजोपयोगी व्हावा यासाठी मी प्रयत करतोय, त्यामुळे माझी आपणा सर्वांना विनंती आहे की, आपण देखील आपला वाढदिवस अश्याच सामाजिक कार्यातून साजरा करावा असेही शेवटी संस्कार लाड यांनी सांगितले आहे.

## चौसाळा येथे पत्रकार संवाद यात्रेचे स्वागत व सत्कार

**चौसाळा । प्रतिनिधी**

दीक्षाभूमी ते मंत्रालय या आयोजित केलेल्या पत्रकार सव्वाद यात्राचे चौसाळा ता बीड येथे आगमन होताच सव्वाद यात्रेतील मान्यवत्राचे स्थानिक पत्रकारच्या वतीने भव्य स्वागत करून मान्यवर पधादिकाऱ्याला सत्कारीत करण्यात आले पत्रकार सव्वाद यात्रा दिनांक १४ रोजी चौसाळा येथे आली असता सव्वाद यात्रे तील महाराष्ट्र राज्य पत्रकार संघटनेचे प्रदेश अध्यक्ष्य वसंत मुंडे प्रदेश सरचटणीस विश्वास आरोटे मराठवाडा विभाग अध्यक्ष्य वैभव स्वामी यांचे स्थानिकचे जेष्ठ पत्रकार एन टी वाघमारे यांनी पुष्पहार घालून त्यांना सत्कारीक करण्यात आले याच कार्यक्रमात एन टी वाघमारे यांनी पत्रकारांना मिळणाऱ्या अधिकृत स्वीकर्ती कार्डमधील घातलेले जाचक व अटी रद्द त्यांना तातडीने कार्ड मिळून द्यावे अशे सुचवले तर सदरील यात्रा चौसाळा येथे येऊन स्थानिक पत्रकराशी सव्वाद साधला या बद्दल आभार व्यक्त केले या सव्वाद यात्रा कार्यक्रमाला चंद्रसेन गुंजाळ. मधुकर तोडकर. बाबू हावले. पत्रकार बळीराम राऊत. पंडित जोगदंड. विकास नायकवाडे. विकास सर्वज्ञ. सुधीर चौधरी. शब्बीर तांबोळी. यांच्या सह इतर मान्यवर उपस्थित होते सव्वाद यात्रे कार्यक्रमाचे आयोजन तुषार वाघमारे यांनी केले तर उपस्तित मान्यवरांचे आभार अक्षय बोबडे यांनी मानले.

## लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात हर घर तिरंगा व आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त मोफत रक्त तपासणी शिबीर

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व महाराष्ट्र राज्य एड्स प्रतिबंध संस्था मुंबई शाखा उपजिल्हा रुग्णालय परळी यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्या दिन व आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त मोफत रक्त तपासणी शिबीराचे आयोजन बुधवारी (ता.१४) करण्यात आले होते. १३५ विद्यार्थिनींची रक्त तपासणी करण्यात आली. तसेच हर घर तिरंगा अभियानांतर्गत विद्यार्थ्यांना तिरंगा ध्वजाचे वाटप करण्यात आले.


७७ व्या स्वातंत्र्या दिनाच्या निमित्ताने लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने हर घर तिरंगा अभियान तसेच महाराष्ट्र राज्य एड्स प्रतिबंध संस्था मुंबई व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात रक्ताच्या विविध चाचण्या शिबीर घेण्यात आले. रक्त तपासणी शिबीराचे उद्घाटन संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा प्रसाद देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपजिल्हा रुग्णालयाचे एचआयव्ही एड्सचे समुपदेशक शरद चव्हाण, प्राचार्या डॉ विद्या देशपांडे, संचालिका छाया पत्की, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा डॉ विनोद जगतकर, प्रा डॉ राजश्री कल्याणकर, प्रा डॉ प्रविण दिग्रसकर उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य एड्स प्रतिबंध



संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थिनींसाठी एड्स जनजागृती पोष्टर प्रदर्शन लावण्यात आले होते.यानंतर विद्यार्थिनींसाठी मोफत रक्त तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. या रक्त चाचण्या मध्ये हेपटीटाइटिस, सीबीसी, आरबीसी, हिमोग्लोबिन आदि रक्त तपासण्या शरद चव्हाण, अमोल गालफडे, अविनाश व्हावळे आदिंनी केल्या. १३५ विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली. हर घर तिरंगा अभियानांतर्गत प्राचार्य डॉ विद्या देशपांडे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना तिरंगा ध्वजाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा प्रविण फुटके यांनी मानले. कार्यक्रमास प्रा डॉ रंजना शहाणे,प्रा प्रविण नव्हाडे, प्रा विशाल पौळ सह विद्यार्थी, शिक्षक,प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.







# केळीला २४०० रुपये क्विंटलचा विक्रमी दर

देशात सध्या महाराष्ट्र, गुजरात व मध्य प्रदेशातच केळी काढणीवर आहे. सणवार, उपवासाचे दिवस सध्या असल्याने केळीला मोठा उठाव सर्वत्र आहे. दर्जेदार केळीचा तुटवडा आहे. परिणामी, केळी दर विक्रमी स्थितीत म्हणजेच २४०० रुपये प्रतिक्विंटलपर्यंत पोहोचले आहेत. या हंगामातील केळी दरांचा हा नवा विक्रम आहे.



खानदेशातही केळीच्या आवकेत मोठी घट मागील दोन महिन्यांत झाली आहे. यंदा खानदेशात एप्रिल ते जूनच्या पहिल्या पंधरवड्यापर्यंत केळीला सरासरी दर फक्त ८०० रुपये प्रतिक्विंटल मिळाला. एप्रिलमध्ये ४०० ते ५०० रुपये प्रतिक्विंटलचा दर होता. कारण या काळात खानदेशात रोज ५०० ट्रक (एक ट्रक १६ टन क्षमता) केळीची आवक सुरू होती. परंतु जूनच्या मध्यानंतर केळीची आवक खानदेशात झपाट्याने कमी झाली. राज्यातही या काळात केळीची आवक कमी झाली. यामुळे केळी दरात सुधारणा सुरू झाली. दर्जेदार केळीचे दर महिनाभरात एक क्विंटलमागे एक हजार रुपयांनी वाढले आहेत. राज्यात सध्या केळीची २०० ट्रक (एक ट्रक १६ टन क्षमता) आवक सुरू आहे. खानदेशात फक्त १०० ते ११० ट्रक केळीची आवक मागील सात ते आठ दिवसांपासून सुरू आहे. यात केळीचे आगार असलेल्या रावेरातून रोज ६० ते ६५ ट्रक केळीची आवक होत आहे.

तर मध्य प्रदेशातील नर्मदा व तापी लगतच्या क्षेत्रात केळीची चांगली आवक होत आहे. बडवानी, बऱ्हाणपूर या जिल्ह्यांत मिळून रोज २५० ट्रक केळीची आवक मध्य प्रदेशात होत आहे. देशात ही सर्वाधिक आवक असल्याची माहिती मिळाली. गुजरातेतही रोज ६० ते ७० ट्रक केळीची आवक आहे. परंतु या केळीचा दर्जा दर्जेदार नाही. देशभरात सणवार, उत्सवांचे वातावरण आहे. श्रावणमास राज्यात सुरू आहे. पुढे गणेशोत्सव, नवरात्रोत्सव व अन्य सणवारांचा कालावधी असेल. यामुळे केळीचा उठाव कायम आहे. उत्तरेकडील मॉल्स व अन्य बाजारांत पाठवणुकीच्या केळीस प्रतिक्विंटल २४०० रुपये दर आहे. तर कमी दर्जाच्या केळीचे दर १५०० ते २००० रुपये आहेत.

### निर्यातीसाठी केळी मिळेनात

देशात सध्या आंध्र प्रदेश, केरळ, तमिळनाडू आदी भागांत पिकवून खाण्यायोग्य केळीची अल्प आवक आहे. आंध्र प्रदेशातील आवक नोव्हेंबरमध्ये सुरू होईल. यामुळे दर्जेदार केळीचा तुटवडा आहे. खानदेशात निर्यातीसाठी हवी तेवढी व हवी तशी केळी उपलब्ध होत नसल्याची स्थिती आहे. राज्यातून सध्या रोज ३१ ते ३२ कंटेनर (एक कंटेनर २० टन क्षमता) केळीची निर्यात होत आहे. त्यास २४०० रुपये प्रतिक्विंटलपर्यंतचा दर आहे. खानदेशातून सध्या रोज सात ते आठ कंटेनर केळीची निर्यात विविध कंपन्या करीत आहेत.

# १०८ प्रकारचे विशेष बियाणे बाजारात!



नवी दिल्ली : अधिक उत्पन्न देणाऱ्या, बदलत्या हवामानास अधिक अनुकूल व बायो-फोर्टिफाइड १०९ बियाणांचे वाण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतेच देशाला अर्पण केले असून हे बियाणे कृषी आणि बागायती पिकांसाठी महत्त्वाचे आहे. या उपक्रमाचा उद्देश कृषी उत्पादकता आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे हा आहे. या जाती भारतीय कृषी संशोधन परिषदेने (आयसीएआर) विकसित केल्या आहेत आणि त्या एकूण ६१ पिकांच्या आहेत. त्यापैकी ३४ शेतातील पिके आणि २७ बागायती पिके आहेत. पंतप्रधानांनी शेतकरी, शास्त्रज्ञांशी यावेळी संवादही साधला.

केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याणमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी सांगितले की, शेतकऱ्यांसाठी हा दिवस ऐतिहासिक आहे, कारण ६१ पिकांच्या १०९ जातींचे बियाणे जारी करण्यात आले आहे. यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास, उत्पादनात वाढ आणि खर्च कमी होण्यास मदत होईल. ते म्हणाले की, या पिकांचे बियाणे हवामानास अनुकूल असून प्रतिकूल हवामानातही चांगले पीक देऊ शकतात. ते म्हणाले की, या जातींमध्ये भरपूर पोषकतत्त्वे आहेत. तृणधान्ये, बाजरी, चारा, तेलबिया, कडधान्ये, ऊस, कापूस आणि फायबर पिके यांचा लागवडीच्या पिकांमध्ये समावेश होतो.

बागायती पिकांमध्ये फळे, भाज्या, मसाले, फुले आणि औषधी वनस्पतींच्या नवीन जातींचा समावेश होतो. पंतप्रधानांनी 'जैव-फोर्टिफाइड' वाणांच्या संवर्धनावर सातत्याने भर दिला असून, कुपोषणाचा सामना करण्यासाठी माध्यान्ह भोजन योजना आणि अंगणवाडी सेवा यासारख्या सरकारी उपक्रमांशी जोडले आहे.

### नवीन वाणाचा खर्च कमी

मोदींनी यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना सांगितले की, ६१ पिकांशी संबंधित हे नवीन वाण कमी खर्चात उपलब्ध होणार असल्याने अत्यंत फायदेशीर ठरणार आहे. यावेळी पंतप्रधानांनी बाजरीच्या महत्त्वावर चर्चा केली आणि लोक पौष्टिक आहाराकडे कसे वाटचाल करत आहेत यावर भर दिला. नैसर्गिक शेतीचे फायदे आणि सेंद्रिय शेतीकडे सर्वसामान्यांची वाढती आवड याबद्दलही पंतप्रधानांनी सांगितले. मोदी म्हणाले की, लोक सेंद्रिय पदार्थांकडे अधिक ओढले गेले असून सेंद्रिय पदार्थांची मागणी अधिक वाढली आहे.

# महाराष्ट्रासह देशातील तीन ऊस उत्पादक राज्ये स्वीकारणार उत्तर प्रदेश मॉडेल!

## १७ सदस्यांच्या पथकाने घेतली मूनभूत माहिती

लखनौ : उत्तर प्रदेशचा साखर उद्योग आणि ऊस विकास विभागाने विकसित केलेल्या 'स्मार्ट शुगरकेन फार्मर' पोर्टल आणि 'ई-शुगरकेन ॲप'ची एकात्मिक आणि पारदर्शक प्रणालीची अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने भारत सरकारच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र, कर्नाटक आणि तामिळनाडू इतर राज्यांच्या १७ सदस्यांच्या पथकाने १३ ऑगस्ट रोजी सितापुरमधील दालमिया साखर कारखाना, रामगढ विभाातील भगवन्तापुर गाव, गोपालपुर तसेच जरिगांवा येथे ऑनलाइन ऊस सर्वेक्षण, मूळ कोटा, ऊस दिनदर्शिका, उसाच्या उतारा निश्चित करणे आणि जारी करणे, गावपातळीवरील सर्वेक्षण, ऊस नोदणी, दुरुस्ती, ऊस पुरवठा, नवीन सभासद बनणे यासंबंधी एकात्मिक आणि पारदर्शक प्रणालीबद्दल मूलभूत माहिती घेतली.

शिष्टमंडळाने सीतापूर जिल्ह्यातील रामगढ येथील सहकारी ऊस विकास समितीमध्ये कार्यरत असलेल्या तक्रार/चौकशी केंद्राला भेट दिली. केंद्रात 'स्मार्ट शुगरकेन फार्मर' पोर्टल आणि 'ई-शुगरकेन ॲप' द्वारे शेतकऱ्यांच्या तक्रारींचे निवारण करण्याच्या प्रक्रियेचे थेट प्रात्यक्षिक प्रत्यक्षपणे पाहण्यात आले. कामात सुलभता, एकसमानता आणि पारदर्शकता यासारखे मूळ उद्दिष्टे तसेच प्रभावी देखरेखीचेही निरीक्षण करण्यात आले. ऑनलाइन पोर्टलद्वारे शेतकऱ्यांच्या समस्यांचे नियंत्रण आणि त्वरित निराकरण कसे केले जाते याचा अनुभव शिष्टमंडळाने घेतला. उत्तर प्रदेशचे ऊस आणि साखर आयुक्त यांच्याकडून भारत सरकारच्या नेतृत्वाखाली या दौरा आयोजित करण्यात आला होता. विविध राज्यांतून आलेल्या शिष्टमंडळाच्या सदस्यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांशी 'स्मार्ट शुगरकेन फार्मर' पोर्टल आणि ई-शुगरकेन ॲपच्या अंमलबजावणीशी संबंधित त्यांच्या सैद्धांतिक आणि व्यावहारिक प्रक्रिया आणि प्रश्नांचे निराकरण करण्यासाठी कार्यक्रमाच्या शेवटी संवाद साधला. प्रश्नोत्तराचा तासही आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अखेरीस, भारत सरकारच्या नेतृत्वाखाली आलेले शिष्टमंडळ उत्तर प्रदेशचा ऊस विभाग आणि साखर कारखानदारांनी 'स्मार्ट शुगरकेन फार्मर' पोर्टल आणि 'ई-गन्ना ॲप-'द्वारे शेतकऱ्यांच्या हितासाठी केलेल्या अभूतपूर्व कामामुळे प्रभावित झाले. शुगरकेन ॲप प्रणालीने केलेल्या कामाचे कौतुक त्यांनी केले. महाराष्ट्र राज्याचे साखर आयुक्त कुणाल खेमनार, कर्नाटक राज्य आयुक्त, ऊस विकास आणि संचालक साखर एम.आर. रविकुमार, तामिळनाडू राज्याचे अतिरिक्त आयुक्त साखर बी. बालमुरुगन त्यांच्या टीम सदस्यांसह उपस्थित होते.


कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यात, दिनांक १४ ऑगस्ट रोजी उत्तर प्रदेशचे ऊस व साखर आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली ऊस विकास विभागाने विकसित केलेले 'स्मार्ट शुगरकेन फार्मर' पोर्टल आणि 'ई-शुगरकेन ॲप' या विषयावर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. लखनौच्या शुगरकेन फार्मर्स इन्स्टिट्यूटच्या सभागृहात राज्यांच्या भेटी देणाऱ्या शिष्टमंडळांसह तपशीलवार विश्लेषणात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात आला.



# पौष्टिक चाऱ्यासाठी संकरित नेपिअर

बहुवार्षिक, भरपूर उत्पन्न देणारे संकरित नेपिअर हे फायदेशीर चारा पीक आहे. पाण्याची सोय असल्यास उन्हाळी हंगामासाठी या पिकाची लागवड फेब्रुवारी महिन्यात करावी. या पिकाच्या लागवडीला उत्तम निचरा होणारी जमीन निवडावी. शक्यतो निचरा न होणाऱ्या, दलदलीच्या जमिनी या पिकाच्या लागवडीसाठी टाळाव्यात. योग्य व्यवस्थापन केल्यास या पिकाचे चांगले उत्पादन मिळते.

संकरित नेपिअर या चाऱ्यामध्ये आठ ते नऊ टक्के प्रथिने असतात. या चारा पिकाचे यशवंत आणि फुले जयवंत (आर.बी.एन. - १३) हे सुधारित वाण आहेत. यशवंत वाणाची वैशिष्ट्ये म्हणजे कापणीनंतर जोमाने होणारी वाढ, अधिक लांबलचक भरपूर फुटवे, मऊ, लांब व रुंद पाने आणि त्यावर अल्प प्रमाणात लव ही आहेत. याचबरोबरीने फुले जयवंत हा नवीन सुधारित वाण यशवंत वाणापेक्षा १० ते १५ टक्के जास्त उत्पादन देतो. यामध्ये ऑक्झिलिक आम्लाचे प्रमाण देखील यशवंत गवतापेक्षा कमी आहे, म्हणून हा वाण जनावरांच्या चाऱ्यासाठी फायदेशीर आहे. या पिकाच्या लागवडीला उत्तम निचरा होणारी जमीन निवडावी. शक्यतो निचरा न होणारी, दलदलीच्या जमिनी या पिकाच्या लागवडीसाठी टाळाव्यात. खत व पाणी व्यवस्थापन योग्य प्रमाणात दिल्यास या गवताची चांगली वाढ होते. संकरित नेपिअर गवत बहुवार्षिक व भरपूर उत्पादन देणारे असल्याने शेत तणविरहित ठेवावे.



लागवडीचे तंत्र : लागवडीपूर्वी उभ्या - आडव्या नांगरटी करून, कुळवाच्या दोन पाळ्या देऊन जमीन भुसभुशीत करावी. शेवटच्या कुळवणीच्या वेळी सात ते आठ टन चांगले कुजलेले शेणखत जमिनीत मिसळावे. खरीप हंगामात जून ते ऑगस्ट आणि उन्हाळ्यात फेब्रुवारी ते मार्च या महिन्यात या गवताची लागवड करावी. याची लागवड ठोंबे मुळासह लावून करावी. तीन महिने वाढू दिलेल्या गवताच्या खोडाच्या जमिनीकडील २/३ भागातील दोन ते तीन डोळे असणाऱ्या कांड्या काढून लावल्यास त्या चांगल्या फुटतात. ठोंबे किंवा कांड्या ९० सें.मी. अंतरावरील सऱ्यांच्या बगलेत लावाव्यात. सरासरी दोन ठोंबांतील अंतर ९० ६० सें.मी. ठेवून लागवड केल्यास आंतरमशागत करणे सुलभ जाते. लागवडीच्या वेळी माती परीक्षणानुसार १०० किलो नत्र, ५० किलो स्फुरद, ५० किलो पालाश द्यावे. त्यानंतर पीकवाढीचा जोम कायम राहण्यासाठी दर चार कापण्यांनंतर २५ किलो नत्र द्यावे. हे बहुवार्षिक बागायती चारा पीक असल्याने तणांचा उपद्रव होतो, त्यामुळे त्याच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होतो. गवताच्या सुरवातीस वाढीच्या काळात एक किंवा दोन खुरपण्या देणे आवश्यक आहे, त्यानंतर गरजेनुसार खुरपणी अथवा खांदणी करावी. गवताच्या भरपूर उत्पादनासाठी पाणी व्यवस्थापनाचा महत्त्वाचा घटक आहे. उन्हाळी हंगामात (फेब्रुवारी ते मार्च) लागवड केल्यास गवताच्या उत्तम वाढीसाठी सुरवातीचे दोन व त्यानंतर आठ ते दहा दिवसांच्या अंतराने पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. पावसाळ्यात (खरीप हंगामात) गरजेनुसार १२ दिवसांच्या अंतराने पाळ्या द्याव्यात, तसेच थंडीच्या दिवसांत १० ते १२ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे.

कापणी व उत्पादन : या गवताची कापणी लागवडीपासून दहा आठवड्यांनी करावी. कापणी जमिनीपासून साधारण १५ ते २० सें.मी. उंचीवर करावी, त्यामुळे फुटवे फुटण्यास चांगली मदत होते. नंतरच्या कापण्या पीकवाढीनुसार सात ते आठ आठवड्यांनी कराव्यात. म्हणजेच सकस, रुचकर, पौष्टिक व रसरशीत चारा उपलब्ध होतो. अशा प्रकारे वर्षभरात सात कापण्या घेता येतात. कापण्या वेळेत करणे आवश्यक आहे, अन्यथा चारा जाड व टणक होऊन पौष्टिकतेचे प्रमाण कमी होऊन, चारा कमी मिळतो. शिफारशीप्रमाणे उत्तम व्यवस्थापन केल्यास प्रति वर्षी आठ ते नऊ कापण्यांद्वारे २५०० ते ३००० क्विंटल चारा एक हेक्टरपासून मिळू शकतो.




## जागतिक दिवस
## भारतीय स्वातंत्र्य दिन

### महत्वाच्या घटना

१५१९ : पनामा सिटी शहराची स्थापना झाली.
१६६४ : कुडाळ प्रांतात शिवाजी महाराजांनी खवासखानाला (दुसऱ्यांदा) पराभूत केले.
१८२४ : अमेरिकेतील गुलामगिरी पासून सुटका झालेल्या व्यक्तींनी लायबेरिया हे राष्ट्र निर्माण केले.
१८६२ : मद्रास उच्च न्यायालयाची स्थापना
१९१४ : पनामा कालव्यातुन एस. एस. ॲनकॉन हे पहिले व्यापारी जहाज पार झाले.
१९२९ : ग्राफ झेपेलिन हा संशोधक 'झेपेलिन' बलूनमधून जगप्रवासासाठी रवाना
१९४५ : दुसरे महायुद्ध - जपानने शरणागती पत्करली.
१९४७ : ब्रिटिश राजवट संपून भारत स्वतंत्र झाला. देशाची फाळणी झाली. पश्चिम पंजाब, सिंध,बलुचिस्तान, वायव्य सरहद्द प्रांत व पूर्व बंगाल हे पाकिस्तानात समाविष्ट झालेले प्रदेश सोडून संस्थाने वगळता राहिलेला प्रदेश स्वतंत्र भारत म्हणून अस्तत्वात आला.
१९४७ : भारताचे पहिले पंतप्रधान म्हणून पं. जवाहरलाल नेहरू यांनी सूत्रे हाती घेतली.
१९४७ : पाकिस्तानचे निर्माते मुहम्मद अली जिना यांचा पाकिस्तानचे पहिले गव्हर्नर जनरल म्हणून कराची येथे शपथविधी झाला.
१९४८ : दक्षिण कोरिया या देशाची निर्मिती झाली.
१९६० : काँगो देश फ्रांसपासून स्वतंत्र झाला.
१९७१ : अमेरिकन डॉलरचे सोन्याशी असलेले संधान खंडित झाले.
१९७१ : बहरैन देशाला युनायटेड किंग्डमपासून स्वातंत्र्य मिळाले.
१९७५ : बांगला देशात लष्करी उठाव होऊन बांगला देशाचे संस्थापक शेख मुजीबूर रहमान व त्यांच्या कुटुंबीयांची हत्या करण्यात आली.
१९८२ : भारतात रंगीत दूरचित्रवाणीच्या प्रसारणास सुरूवात झाली.
१९८८ : पंतप्रधान राजीव गांधी यांनी लाल किल्ल्यावरून केलेल्या भाषणानंतर 'मिले सुर मेरा तुम्हारा' हे गाणे दूरदर्शनवरुन पहिल्यांदाच प्रसारित करण्यात आले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७६९ : नेपोलिअन बोनापार्ट - फ्रान्सचा सम्राट, असामान्य सेनापती आणि कर्तबगार प्रशासक (मृत्यू: ५ मे १८२१ सेंट हेलेना)
१७९८ : भारतीय योद्धा संगोली रायन्ना यांचा जन्म. (मृत्यू: १८३१)
१८६५ : रेकी चे निर्माते मिकाओ उस्ूई यांचा जन्म. (मृत्यू: १९२६)
१८६७ : गणपतराव जोशी - रंगभूमीवरील असामान्य अभिनेते, शेक्सपियरच्या नाटकांतील त्यांच्या भूमिका अतिशय गाजल्या होत्या (मृत्यू: ७ मार्च १९२२)
१८७२ : योगी अरविंद घोष - क्रांतिकारक, तत्त्वचिंतक, योगी व कवी (मृत्यू: ५ डिसेंबर १९५० पाँडिचेरी)
१८७३ : भारतीय पुरातात्त्विक व इतिहासकार रामप्रसाद चंदा यांचा जन्म. (मृत्यू: २८ मार्च १९४२)
१९०४ : मोटार व्हीलचेअर चे शोधक जॉर्ज क्लाईन यांचा जन्म. (मृत्यू: ४ नोव्हेंबर १९२२)
१९१२ : 'सूर रंग' उस्ताद अमीर खाँ - इंदौर घराण्याचे संस्थापक व गायक (मृत्यू: १३ फेब्रुवारी १९७४)
१९१३ : भगवान रघुनाथ कुळकर्णी ऊर्फ 'फुलारी' ऊर्फ 'बी. रघुनाथ' -लेखक व कवी (मृत्यू: ७ सप्टेंबर १९५३)
१९१५ : इस्मत चुगताई - ऊर्दू कथा व पटकथा लेखिका (मृत्यू: २४ आक्टोबर १९९१)
१९१७ : अंबूताई गोरे तथा सरोजिनी मधुसूदन शारंगपाणी - ललित, वैचारिक, नाट्य, काव्य आदी विविध प्रकारांत मोठ्या प्रमाणावर लेखन करणार्‍या लेखिका. 'दुर्दैवाशी दोन हात' या त्यांच्या आत्मचरित्रपर पुस्तकाला १९७५ मधे राज्य सरकारचा पुरस्कार मिळाला होता. (मृत्यू: १३ नोव्हेंबर २००१)
१९२२ : वामनदादा कर्डक - लोककवी
१९२९ : उमाकांत निमराज ठोमरे - साहित्यिक, अनेकांना लिहिते करणारे, वाचकप्रिय 'वीणा' या दर्जेदार मासिकाचे संपादक, बालसाहित्यकार (मृत्यू: ७ आक्टोबर १९९९)
१९४५ : बेगम खालेदा झिया - बांगला देशच्या पंतप्रधान
१९४७ : राखी - चित्रपट अभिनेत्री
१९५८ : सिंपल कपाडिया - अभिनेत्री आणि वेशभूषाकार (मृत्यू: १० नोव्हेंबर २००९)
१९६१ : भारतीय अभिनेत्री आणि पटकथालेखक सुहासिनी मणिरत्नम यांचा जन्म.
१९६४ : बिल आणि मेलिंडा गेट्स फाऊंडेशन च्या सह-संस्थापिका आणि बिल गेट्स यांच्या पत्नी मेलिंडा गेट्स यांचा जन्म.
१९७१ : भारतीय गायक आणि संगीतकार अदनान सामी यांचा जन्म.
१९९२: भारतीय बुद्धिबळपटू भास्करन आडहान यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१०५७ : स्कॉटलंडचा राजा मॅक बेथ यांचे निधन.
१११८ : कॉम्नेनस, बायझेन्टाईन सम्राट ॲलेक्सियस (पहिला) यांचे निधन.
१९३५ : अमेरिकन अभिनेते विल रॉजर्स यांचे निधन.
१९४२ : महादेव देसाई - स्वातंत्र्य लढ्यातील नेते आणि महात्मा गांधींचे स्वीय सहाय्यक (जन्म: १ जानेवारी १८९२)
१९७४ : स्वामी स्वरुपानंद यांनी समाधी घेतली (जन्म: १५ डिसेंबर १९०३)
१९७५ : शेख मुजीबुर रहमान - बांगलादेशचे संस्थापक व पहिले राष्ट्राध्यक्ष यांची लष्करातील सैनिकांनी त्यांच्या प्रासादावर हत्या केली. (जन्म: १७ मार्च १९२०)
२००४ : अमरसिंग चौधरी - गुजरातचे मुख्यमंत्री (जन्म: ३१ जुलै १९४१)
२००५ : भारतीय त्वचाशास्त्रज्ञ आणि शैक्षणिक बँडापुडी वेंकट सत्यनारायण यांचे निधन. (जन्म: ३० जानेवारी १९२७)

# मुख्य कार्यकारी अधिकारी कारवाई करीत नसल्याने जिल्हा परिषदसमोर उपोषण

जालना । प्रतिनिधी

ताडहादगांव (ता. अंबड) येथील पाझर तलाव गट क्रमांक ५३८ येथील संपादीत क्षेत्रात अनेकांनी अतिक्रमण केले. तसेच गट क्रमांक ५४७ मधील गायरान जमिनीवरील अतिक्रमण धारकांनी ग्रामपंचायतीला अवैध नमुना नंबर ८ ला नावे लावली आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून अतिक्रमण पाडावीत अन्यथा १३ ऑगस्ट रोजी जिल्हा परिषदेच्या जालना येथील कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा कुंडलिक विश्वनाथ हरिश्चंद्रे यांनी इसारा दिला होता

याबाबत जिल्हा परिषदेच्या सिईओ यांना काहीच कारवाई न केल्यामुळे आज १३ ऑगस्ट पासून उपोषण सुरू केला आहे. दिलेल्या निवेदनात म्हटले की, ताडहादगांव येथील गट क्रमांक ५३८ पाझर तलाव मधील अतिक्रमण व गट क्रमांक ५४७ सरकारी गायरान जमिनीवरील अतिक्रमणबाबत लेखी व तोंडी तक्रारी जलसंधारण विभत्तग, जिल्हा परिषद लघु पाटबंधारे व पंचायत समिती अंबड यांच्याकडे करण्यात आली होती. मात्र संबंधीत विभागाने याकडे दुर्लक्ष केले. सदरील जागेत अनेकांनी अतिक्रमण करून, प्लॉटची विक्री केली. आज रोजी सदर ठिकाणी आर.सी.सी. ची पक्के घरी आहेत. अतिक्रमणामध्ये सांडवाही गायब झाला. मुळ सांडव्याचा प्रवाह बदलून सांडवा अरूंद केला. यामुळे भविष्यात सांडव्यामुळे भविष्यात जीवीतहानी व जनावरांची हाणी होण्याचा धोकाही उत्पन्न झाला आहे. विशेष म्हणजे या अतिक्रमण संदर्भात अंबड पंचायत समितीचे विस्तार अधिकारी ए.ए. चव्हाण यांच्याकडे चौकशी देण्यात आली. मात्र विस्तार अधिकारी चव्हाण यांनी घटनास्थळी न जाता थातुर मातुर कार्यालयात बसून चौकशी केल्याचे कुंडलिक विश्वनाथ हरिश्चंद्रे यांनी तक्रारीत नमुद केले आहे. चौकशी करतांना विस्तार अधिकारी चव्हाण यांनी सदर ठिकाणी येवून पाहणी करणे गरजेचे होते. व पाझर तलाव व गायरान जमिनीत अतिक्रमण करणार्यांना नमुना नंबर ८ दिला कसा? याबाबत चौकशी करून अहवाल देणे अपेक्षीत होते मात्र त्यांनी सदर चौकशी कार्यालयात बसवून केल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. ताडहादगांवचा पाझर तलाव, गायरान जमिन अतिक्रमण प्रकरणासह बनावट चौकशी करणार्या विस्तार अधिकारी चव्हाण यांची चौकशी करून, न्याय द्यावा या मागणीसाठी १३ ऑगस्ट रोजी जि.प. जालना कार्यालयासमोर अमरण उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला होता याप्रकरणी जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दखल ना घेतल्यामुळे उपोषण करण्याची वेळ उपोषणकर्त्यावर आली आहे.




## अतिक्रमण धारकांना नोटीसा

ताडहादगांव येथील पाझर तलाव क्रमांक ५३८ संपादीत क्षेत्रातमध्ये अतिक्रमण केल्याचे प्रथमदर्शनी लघुपाटबधांरे जलसंधारण जि.प. जालना यांना दिसून आले आहे.

# राष्ट्रध्वजाचा अवमान रोखण्यासाठी रवी कांबळे यांना निवेदन



अंबड । प्रतिनिधी

राष्ट्रध्वजाचा होणारा अवमान रोखण्यासाठी कायदेशीर कारवाई करावी १५ ऑगस्ट व २६ जानेवारी या दिवशी राष्ट्रध्वज सर्वजण आनंदाने खरेदी करतात मात्र हेच राष्ट्रध्वज त्याच दिवशी रस्त्यावर, गटारात, कचराकुंडीत फाटलेल्या अवस्थेत आढळून येतात हे राष्ट्रध्वज प्लास्टिकचे असल्याने ते लगेच नष्टही होत नाहीत. यामुळे राष्ट्रध्वजाची अनेक दिवस विडंबन पहावि लागते.

हिंदू जनजागृती समितीने याविषयी जनहित याचीका ही न्यायालयात दाखल केली होती. तिची सुनावणी करतेवेळी न्यायालयाने राष्ट्रध्वजाचा अवमान रोखावा यासाठी शासनाला आदेश दिले आहेत केंद्र शासनाने तर प्लास्टिक वर बंदी घातली आहे. यामुळे राष्ट्रीय मान चिन्हाचा गैरवापर रोखणे कायदा १९५० कलम २ व ५ तसेच राष्ट्र प्रतिष्ठा अधिनियम १९७१ चे कलम २ अधिनियम १९५० या कायद्यानुसार हा दंडनीय अपराध आहे . हिंदू जनजागृती समिती गेल्या २१ वर्षापासून राष्ट्रध्वजाचा सन्मान राखावा यासाठी उपक्रम सुरू आहे समितीने शासनाकडे काहीमागण्या केल्या आहेत शासनाने राष्ट्रध्वजाचा अवमान रोखण्यासाठी कृती समिती स्थापन करावी प्लास्टिकचे राष्ट्रध्वजाचे उत्पादन व विक्री होत असलेल्या ठिकाणी व संबंधितावर कारवाई करावी यासाठी हिंदू जनजागृती समितीच्या वतीने अंबड येथिल तहसील विभागांमध्ये पेशकर रवी कांबळे यांना निवेदन देण्यात आले आली आहे. या निवेदनावर समितीच्या नाव रवींद्र आंबीलवादे ,दत्तात्रय हरणे, अनिल पाष्टे ,राधेश्याम पवार ,महेश शहाणे ,संजय देशमुख श्याम पास्टे इत्यादी सर्वजण उपस्थित होते. यावेळी रवी कांबळे म्हणाले की आम्ही संबंधितावर लगेच कारवाईची सुरुवात करतो आहे.

## थोडक्यात



### श्रवण मासा निमित्ताने श्रीरामचरित्र मानसचे पारायण

माजलगाव । प्रतिनिधी

येथील राजस्थानी मंगल कार्यालयात रामायणाचे पाठाचे वाचनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. माजलगावच्या विख्यात गायिका श्रीमती छाया राजेंद्र शर्मा यांच्या सुमधुर वाणी मध्ये पारायणाचे गायन होत आहे. शर्मा या माजलगाव चे स्वर्गीय बाबूलाल शर्मा यांच्या सुनबाई आहेत. आध्यात्मिक व सामाजिक क्षेत्रात रुची असल्यामुळे आपल्या व्यस्त दैनदिनातुन वेळ काढून माहेश्वरी महिला मंडळाच्या आग्रहास मान देऊन छाया राजेंद्र शर्मा नवान्ह पारायण मध्ये निष्काम भावनेने संगितमय सेवा देत आहेत.

या रामायण पाठचे यजमान पदी अनिता सुनील मालानी यांचा कडे आसुन त्या प्रंसगी प्रभू रामचंद्रजी चे प्रसंगानुसार देखावे करण्यात येत आहेत . प्रत्येक दिवशी देखाव्या नुसार लहान मुलांची सजावट करून अतिशय भक्तीमय व आनंदी वातावरण पाठाचे संगीतमय मधुर वाणीतुन भक्तांना श्रवन करण्यास येत आहे. रामायणामधील त्याग, सदाचाराचे शिक्षण मिळत आहे. १७ऑगस्ट २०२४ पर्यंत हे पारायण चालू राहील जास्तीत जास्त भाविक भक्तांनी या रामायण पाठाचा लाभ घ्यावा हि विनंती माहेश्वरी महिला मंडळाच्या वतीने करण्यात आली आहे.

### शासनाने पत्रकारांच्या मागण्या प्राधान्याने मंजूर कराव्यात -प्रा.ईश्वर मुंडे

बीड । प्रतिनिधी

भारतीय लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारीतेकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देवून हा स्तंभ मजबूत करण्यासाठी पत्रकार बांधवांच्या मागण्या प्राधान्याने मंजूर कराव्यात असे अवाहन शासनाला राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्ष, सेवा निवृत्त अधिकारी कर्मचारी सेल चे राज्य प्रमुख



प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे केले आहे. प्रा.ईश्वर मुंडे पुढे म्हणाले की, लोकशाहीत राज्यकर्ते,प्रशासन व समाज व्यवस्थेवर अंकुश ठेवण्याचे प्रभावी काम पत्रकार करत असतात.यातून लोकशाही बळकट होऊन देशाच्या विकासास हातभार लागत आसतो. या साठी पत्रकार व पत्रकारिता ही व्यवस्था मजबुत झाली पाहीजे. या साठी पत्रकार वेळोवेळी आपल्या मागण्या शासनाकडे करत आसतात परंतू कॅमेरॅसमोर किंवा पत्रकार परिषदेत पत्रकारांना गोड बोलणारे राज्यकर्ते नंतर मात्र त्यांच्या मागण्यांकडे दूर्लक्ष करतात.या मुळे अनेक वेळा पत्रकारांचा आवाज दाबला जाऊन पत्रकारांवर भयानक प्रसंग ओढावतात. करीत पत्रकार बांधवांना जागृत करणे व आपल्या रास्त मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधणे या साठी दि.२८ जुलै २०२४ पासून दिक्षाभूमी ते मंत्रालय अशी पत्रकार संवाद यात्रा सुरू आहे. तरी शासनाने पत्रकारांच्या मागण्यांकडे सकारात्मक लक्ष देवून मागण्या प्राधान्याने मंजूर कराव्यात असे अवाहन शासनास प्रा.ईश्वर मुंडे यांनी केले आहे.

# एका सफाई कर्मचाऱ्यास शासकीय ध्वजारोहण करण्याची संधी



माजलगाव । प्रतिनिधी

''हर घर तिरंगा'' आझादी का अमृत महोत्सव या अभियानांतर्गत माजलगाव नगरपरिषदेतील सफाई कर्मचारी रावईबाई भोले यांच्या हस्ते नगर परिषद कार्यालयात ''तिरंगा ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. एका सफाई कर्मचाऱ्यास शासकीय ध्वजारोहण करण्याची संधी दिल्याने हा माजलगाव नगर परिषदेचा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आल्याने सर्व कर्मचाऱ्यांकडून आनंद व्यक्त केला. व मुख्याधिकारी यांचे आभार व्यक्त केले.हे शासकीय ध्वजारोहण करण्याचं ''सौभाग्य'' प्राप्त करून दिल्याबद्दल व एक चांगला पायंडा पाडल्या बद्दल मुख्याधिकारी, ओ.एस.जगदीश जाधवर, सुपरवायझर संतोष घाडगे,सुपरवायझर विलेशजी कांबळे यांचे देखील कौतुक करण्यात आले.नगरपरिषदेच्या सुसज्ज इमारतीवर हे तिरंगा ध्वजाचे ध्वजारोहण अगदी आनंदमय वातावरणात पार पडले.या वेळी नगर परिषद कर्मचारी व संपूर्ण कार्यालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने उत्साहात उपस्थित होते.

# वृक्षारोपणाच्या माध्यमातून गावाचा कायापालट करणार-हांगे

पाटोदा । प्रतिनिधी

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत आयोजित रोपवितरण व वृक्षारोपण कार्यक्रमाच्या माध्यमातून चुंबळी गावाचा कायापालट करणार असे प्रतिपादन प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांनी केले. येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचा रासेयो विभाग, चंपारण्य ग्रीन क्लब व ग्रामपंचायत चुंबळी यांच्या संयुक्त विद्यमाने १४ ऑगस्ट रोजी मौजे चुंबळी येथे आयोजित हर घर तिरंगा जनजागृती अभियान रॅली व रोपवितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

व्यासपीठावर सरपंच डॉ. रेश्माताई पवळ, पुण्याच्या वॉटरशेड ऑर्गनायजेशन ट्रस्टच्या तालुका समन्वयक राणी थोरवे, तांत्रिक मार्गदर्शन अधिकारी अनिल पालवे, मुख्याध्यापक टेकाडे सर, मु. अ. गर्जे सर, कादरी सर, युवा कार्यकर्ते प्रविण पवळ आदि उपस्थित होते.



याप्रसंगी सरपंच डॉ. रेश्माताई पवळ यांनी महाविद्यालयाच्या वतीने वाटप करण्यात आलेल्या १३० रोपट्याचे ग्रामस्थांनी दारोदारी रोपण करून योग्य पद्धतीने संवर्धन करावे व गावाच्या सौंदर्यात भर घालावी असे आवाहन केले. त्यानंतर अनिल पालवे, टेकाडे सर, गर्जे सर, नरहरी पवळ यांनी ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. रोपवितरण कार्यक्रमापूर्वी गावातून सवाद्य हर घर तिरंगा जनजागृती अभियान रॅली काढण्यात आली. रॅलीमध्ये शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी व ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. अशोक नागरगोजे यांनी केले. सूत्रसंचालन रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. सोमनाथ लांडगे यांनी केले. आभारप्रदर्शन प्रा. मनिषा गाढवे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी नामदेव ढोले, भागवत सानप, विनोद पव्हणे, मोहन सोनवणे, रामराव गोंदकर, महादेव नागरगोजे, गोविंद पवळ, मच्छिन्द्र पवळ यांनी विशेष परिश्रम घेतले.

# संत रामदास महाविद्यालयामध्ये सायबर सुरक्षा' कार्यशाळा

घनसावंगी । प्रतिनिधी

सद्य परिस्थितीमध्ये सोसियल मीडियाद्वारे विद्यार्थ्यांना फसवले जाऊ शकते, त्यांना दीशाहीन करून आकर्षित केले जाते. याविषयी जागृती करण्यासाठी एम के सी एल चे मार्केटिंग एक्झिक्यूटिव्ह श्री श्रीकृष्ण मिसाळ यांच्या मार्गदर्शनात 'सायबर सुरक्षा जागृती' या विषयी संत रामदास महाविद्यालय, घनसावंगी येथे प्राचार्य डॉ राजेंद्र परदेशी यांच्या अध्यक्षतेमध्ये कार्यशाळा घेण्यात आली.

पी पी टीच्या माध्यमातून सायबर क्राईम समजाऊन सांगत असताना सायबर तज्ञ श्री मिसाळ यांनी सोप्या भाषेत विद्यार्थ्यांना माहिती दिली . ''सायबर सुरक्षा म्हणजे काय? - सायबर सुरक्षा म्हणजे मोबाईल, इंटरनेट आणि ऑनलाईन माहितीचे संरक्षण करणे. पॅकिंग, फिशिंग, व्हायरस आणि इतर सायबर हल्ल्यांपासून तुमचे संरक्षण करणे होय. सामान्य धोके आणि त्यांच्यापासून कसे वाचावे? - आपला पासवर्ड सुरक्षित ठेवावा. ई-मेल किंवा मेसेज मधून फसवणूक होणार नाही याची काळजी घ्यावी, वैयक्तिक माहिती उघडपणे शेअर करू नये. सार्वजनिक वायफाय चा वापर शक्यतो टाळावा. सुरक्षित वर्तनाचे नियम, सॉफ्टवेअर अपडेट असणे, फायर बॉल आणि अँटिव्हायरस सॉफ्टवेअर वापरावे. नियमितपणे दोन स्तरीय इंटरनेट वापरल्याने सुरक्षितता येते. सायबर हल्ला झाला तर काय करावे? - सायबर हल्ला झाल्यावर त्याचा तपशील जतन करावा, जसे की हल्ला कधी झाला? काय झाले? इंटरनेट संबंधित संस्थेची संपर्क करावा. ऑनलाईन सेवा



संदर्भातील कंपन्यांशी संपर्क करावा. तज्ञांची तांत्रिक मदत घ्यावी. हे सर्व आपण स्वतः करावे आणि इतरांना जागृत करावे, मित्रपरिवार आणि सर्व सहकाऱ्यांना सायबर सुरक्षा आणि त्याचे महत्त्व समजावून सांगितले पाहिजे. कोणत्याही संशयास्पद क्रियाकल्पाबद्दल तात्काळ माहिती घ्यावी. सायबर सुरक्षा एक सतत प्रयत्नशील क्षेत्र आहे. त्यामुळे स्वतःला अपडेट ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे.'' कार्यशाळेचे संयोजक 'संत रामदास महाविद्यालय संगणक प्रशिक्षण केंद्रा'चे संयोजक श्री विशाल कुरहे यांनी प्रास्ताविक केले. या कार्यशाळेसाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, चे सिनेट सदस्य प्रा नाना गोडबोले, प्रा रमेश होसूरकर यांची विशेष उपस्थिती होती कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा सुधाकर झुंजुरे यांनी केले. याप्रसंगी मोठ्या संख्येने विद्यार्थी, विद्यार्थिनी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना समितीच्या अध्यक्षपदी सतीश घाटगे

जालना । प्रतिनिधी

महायुती सरकारने आर्थिक दुर्बल घटकांतील महिलांना आधार देण्यासाठी मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना सुरु केली आहे.या योजनेचा लाभ शेवटच्या गरीब महिलापर्यंत पोहोचविण्यासाठी शासनाने विधानसभा क्षेत्रनिहाय समिती तयार केली आहे.त्यानुसार घनसावंगी विधानसभेच्या समितीच्या अध्यक्षपदी समृद्धी कारखान्याचे चेअरमन तथा भाजप नेते सतीश घाटगे पाटील यांची यांची शासनाने निवड केली आहे.या निवडीचे सर्व जनतेने स्वागत केले आहे.



मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना राज्यात लोकप्रिय ठरली आहे.या योजनेअंतर्गत २१ ते ६५ वयोगटातील आर्थिक दुर्बल घटकांतील महिलांच्या बँक खात्यात दर महिन्याला १५०० रुपये जमा होणार आहेत.विवाहित,विधवा,घटस्फोटित,परित्यक्ता आणि निराधार महिलांना या योजनेचा लाभ मिळणार आहे.या योजनेचा लाभ प्रत्येक पात्र महिला भगिनींना मिळावा यासाठी घनसावंगी विधानसभेसाठी शासनाने समिती गठीत केली असून या समितीच्या अध्यक्षपदी सतीश घाटगे पाटील यांची निवड मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशान्वये जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांनी केली आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माझ्यावर दाखवलेला विश्वास सार्थ ठरविण्यासाठी मी प्रयत्नशील राहणार आहे.घनसावंगी विधानसभेतील एकही लाडकी बहिण या योजनेपासून वंचित राहणार नाही,हा माझा सर्व भगिनींना शब्द आहे.या योजनेची अंमलबजावणी युद्धपातळीवर करण्यात येईल.या योजनेसंदर्भात कोणतीही अडचण भासल्यास अंबड व घनसावंगी येथील जनसेवा कार्यालयाशी संपर्क साधावा.अर्ज सादर न करू शकलेल्या महिलांचा गावात जाऊन अर्ज भरून घेण्यात येईल.त्यामुळे महिलांनी निश्चिंत राहावे....सतीश घाटगे पाटील,लाडकी बहिण योजना अध्यक्ष,घनसावंगी विधानसभा

# रानबा गायकवाड यांना वामनदादा कर्डक जीवन गौरव पुरस्कार जाहीर

परळी । प्रतिनिधी

जेष्ठ पत्रकार व साहित्यिक रानबा गायकवाड यांना लोककवी, महाकवी वामनदादा कर्डक यांच्या जयंतीनिमित्त अभिरा फाउंडेशन महाराष्ट्र यांच्या वतीने यावर्षीचा जीवन गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. गुरुवार दि. २२ ऑगस्ट २०२४ रोजी बी. रघुनाथ सभागृह ,परभणी येथे मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार वितरण सोहळा पार पडणार असल्याचे अभिरा फाउंडेशनचे प्रमुख भन्ते मुदितानंद यांनी कळविले आहे. विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार घराघरात पोहोचविण्याचे महान कार्य करणारे लोककवी वामनदादा कर्डक यांची १५ ऑगस्ट रोजी १०२ वी जयंती आहे. या जयंतीच्या निमित्ताने प्रतीवर्षी अभिरा फाउंडेशन महाराष्ट्र यांच्या वतीने जीवन गौरव पुरस्कार आंबेडकर चळवळीतील व सामाजिक क्षेत्रातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तीचा जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरव करण्यात येतो.

२०२४ साठीचा जीवनगौरव पुरस्कार परळी येथील ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक तथा विचारवंत रानबा गायकवाड यांना जाहीर करण्यात आला आहे. यापूर्वी रानबा गायकवाड यांना मूकनायक राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार' , शांताबाई शेळके राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार, फिल्म डिव्हिजन ऑफ इंडियाचा पुरस्कार , विद्रोही कवी नामदेव ढसाळ साहित्य पुरस्कार ,गोवा फिल्म फेस्टिवलचा बेस्ट स्टोरी रायटर अवॉर्ड, कलिंगा फिल्म फेस्टिव्हल बेस्ट स्क्रीनप्ले अवॉर्ड,पत्रकारिता क्षेत्रातील जीवन गौरव पुरस्कार, परळी भूषण पुरस्कार , बीड जिल्हा ग्रंथालय संघाचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर सर्वोत्कृष्ट ग्रंथ लेखक पुरस्कार असे ५० पेक्षा अधिक पुरस्कार आतापर्यंत मिळालेले आहेत. पत्रकारितेच्या क्षेत्रात पंचवीस वर्षापेक्षा अधिक काळापासून रानबा गायकवाड कार्यरत आहेत. फुले-शाहू-आंबेडकरी चळवळीचे मुखपत्र दैनिक सम्राट चे पत्रकार म्हणून त्यांची ख्याती आहे.



त्यांनी पाच पुस्तके, पाच नाटके, पाचपेक्षा अधिक लघुपट,कथा, कवितांचे लेखन केले आहे.त्यांचे सर्जनशील दिग्दर्शक डॉ. सिद्धार्थ तायडे दिग्दर्शित 'भीमयुग' हे क्रांतीकारी आंबेडकरवादी नाटक खूप गाजले आहे. आंबेडकरी चळवळीतील अनेक आंदोलनात त्यांचा सक्रिय सहभाग आहे.पत्रकारिता, सामाजिक कार्य, साहित्य,सिने व नाट्य क्षेत्रातील त्यांच्या कार्याची दखल घेऊन लोककवी, महाकवी वामनदादा कर्डक यांच्या जयंती निमित्त दिला जाणारा सन २ २४ च्या जीवन गौरव पुरस्कारासाठी संयोजकांनी त्यांची निवड केली आहे.

त्यांना जाहीर झालेल्या या पुरस्काराबद्दल प्रसिद्ध बालसाहित्यिक आबासाहेब वाघमारे,प्राचार्य डॉ.कमलाकर कांबळे, आंतरराष्ट्रीय ख्याती प्राप्त लेखक, दिग्दर्शक प्रा. डॉ.अनिल कुमार साळवे,प्रसिद्ध लेखक, दिग्दर्शक प्रा. डॉ.सिद्धार्थ तायडे,प्रख्यात साहित्यिक प्रोफे. डॉ. संजय जाधव, राष्ट्रीय पुरस्कार विजेते उद्योजक तथा ग्लोबल आडगाव सिनेमाचे निर्माते मनोज कदम राष्ट्रीय , उद्योजक अमृत मराठे, साहित्यिक ए. तु. कराड, महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कवी डॉ. मुकुंदराज राजपंखे, प्रदीप खाडे,प्रसिद्ध लेखक व विचारवंत अजयकुमार गंडले, प्रा.दयासागर मस्के, बालासाहेब इंगळे,प्राचार्य डॉ. रमेश इंगोले,शिवाजीराव बनसोडे, सौदागर कांदे, प्रसिद्ध निवेदक बा.सो.कांबळे,सिने नाट्य अभिनेते शेख गणी, नागेश्वर खंदारे ,कवी नागनाथ बडे, महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कवी अरुण पवार, प्रा. डॉ. राजकुमार यल्लावाड, गझलकार दिवाकर जोशी,कवी अनंत मुंडे, प्रा. संजय आघाव ,कवी सिद्धेश्वर इंगोले, विठ्ठलराव झिलमेवाड, दत्ता वालेकर, इंजि. भगवान साकसमुद्रे, पत्रकार विकास वाघमारे, चंद्रमणी वाघमारे, नवनाथ दाने,विनायक काळे,आदिंनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२४/५२३
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- १८/०७/२०२४

नाव बदलण्याचा

**जाहिरनामा**

**अर्जदार श्री/सौ/श्रीमती : दिपक प्रल्हाद सावंत रा. बारसवाडा ता. अंबड जि. जालना, प्रकरण : सर्व्हे नं. ९१ प्लॉट नं. ३२ नं.प. मि.नं.१८-७६-३२ चे हस्तांतरण करणेबाबत**

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८-७६-३२) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व-प्लॉट नं. २५, पश्चिम : ९ मिटर रुंदिचा कॉलनी अंतर्गत रस्ता
दक्षिण-प्लॉट नं. ३३, उत्तर- प्लॉट नं. ३१

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२४/५७२
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- ०५/०८/२०२४

नाव बदलण्याचा

**जाहिरनामा**

**अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) शमशाद इफ्तेखार शेख, २)शेख फातेर आहेमद इफ्तेखार, ३)शेख फरदीन इफ्तेखार ४) शेख विखार अहमद सरदारोद्दिन, ५) जुल्फेखार सरदारोद्दिन रा. अंबड , प्रकरण : नं.प.मि.नं.९-१०८ सि.स.नं. १३-७२ चे वारसा अधारे हस्तांतरण करणे बाबत.**

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (९-१०८) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व-रस्ता - पश्चिम : रामा परविन यांची जागा
दक्षिण-इनामदार यांची घरे, उत्तर- रस्ता

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

# बीड विधानसभा मतदारसंघात सर्कलनिहाय आरोग्य शिबिर घेणार : डॉ.योगेश क्षीरसागर

## चौसाळा येथे आरोग्य शिबिरात १ हजार २६१ रुग्णांची तपासणी; ७४३ रुग्णांना चष्मे वाटप

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने बीडमध्ये नुकतेच मोफत आरोग्य शिबिर घेतले. त्या शिबिराला मिळणारा प्रतिसाद आणि रुग्णांची निकड लक्षात घेता बीड विधानसभा मतदारसंघात ग्रामीण भागात सर्कलनिहाय मोफत आरोग्य शिबिर घेणार आहोत, अशी माहिती पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली.

बीड तालुक्यातील चौसाळा येथील कला व विज्ञान महाविद्यालयाच्या प्रांगणात बुधवारी (दि.१४) सकाळी ११ ते ५ या वेळेत मोफत आरोग्य शिबिर पार पडले. शिबिराचे उद्घाटक म्हणून डॉ.योगेश क्षीरसागर हे बोलत होते.

व्यासपीठावर पंचायत समितीचे माजी सभापती काकासाहेब जोगदंड, माजी सदस्य सुनील झोडगे, नेत्ररोग तज्ञ डॉ.प्रवीण शिरुडे, डॉ.सुलेमान शेख, डॉ.रंगनाथ काळे, डॉ.दीप जाधव, डॉ.संजय रंधे पाटील, डॉ.अजय कुटे, राष्ट्रवादी काँग्रेसचे डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ.रमेश शिंदे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष विठ्ठल हांगे, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे, बोरखेडचे सरपंच सुनील अनपट, अशोक सोनवणे, गणेश काकडे, रवी वेदपाठक, गंगाधर जाधव, राजाभाऊ क्षीरसागर, संतोष तांदळे, बबलू शिंदे, कुमार मिटकरी, पंकज शिंदे, कुमार जाधव, तानाजी थोरात, जेबा पिंपरीचे माजी सरपंच सहदेव चौधरी, प्रा.पंडित गुंजाळ, अभिमान येडे, पांडुरंग येडे, मंगळाजी येडे, बबलू थोरात आदींची उपस्थिती होती.



पुढे बोलताना डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, ग्रामीण भागात आरोग्याच्या अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आपण प्रयतशील आहे. बीडमध्ये झालेल्या आरोग्य शिबिरातील शेकडो रुग्णांवर शस्त्रक्रिया केल्या. काही शस्त्रक्रिया शासनाच्या योजनेतून होत नसल्या तरी खाजगी रुग्णालयातून करून देण्यासाठी प्रयत केले जातील. पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या सूचनेनुसार ग्रामीण भागात आरोग्य शिबिरे घेण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार चौसाळा येथे सर्कलमधील रुग्णांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन केले. रुग्णांची तपासणी करून उपचार केले जातील. आवश्यकतेनुसार रुग्णांवर शस्त्रक्रिया करण्यासाठी सर्वोतपरी सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही देत डॉ.योगेश क्षीरसागर यांनी शिबिरात आरोग्य सेवा देणाऱ्या डॉक्टरांचे आभार मानले. यावेळी शिबिरात १ हजार २६१ रुग्णांची तपासणी केली असून ६७ रुग्णांची शस्त्रक्रिया केली जाणार आहे. तसेच, ७४३ रुग्णांना चष्मे वाटप केले आहेत. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.विलास भिल्लारे, सूत्रसंचलन प्रा.सुधीर माने यांनी केले. आभार डॉ.सुदर्शन अवस्ती यांनी मानले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, पत्रकार, रुग्णांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### तज्ञ डॉक्टरांकडून तपासणी; ६७ रुग्णांवर होणार शस्त्रक्रिया

आरोग्य शिबिरात तब्बल १ हजार २६१ रुग्णांची तपासणी केली. त्यापैकी ६७ रुग्णांवर शस्त्रक्रिया होणार आहे. शिबिरात रुग्णांची ब्लड प्रेशर, शुगर, हृदय, ईसीजी तपासणी करून ठराविक औषधे मोफत देण्यात आली. डोळे तपासणीनंतर ७४३ रुग्णांना मोफत चष्मे देण्यात आले. आवश्यकतेनुसार सोयीसुविधायुक्त रुग्णालयांमध्ये शस्त्रक्रिया मोफत करून दिल्या जाणार आहेत.

# पीक कर्ज नाकारलेल्या शेतकऱ्यांना मिळणार पीक कर्ज

**परळी । प्रतिनिधी**

परळी तालुक्यातील असंख्य शेतकऱ्यांना पीक कर्ज न भेटलेल्या शेतकऱ्यांच्या मदतीला किसान सभा खंबीरपणे पाठीशी उभी राहिली असून तालुक्यातील शेकडो शेतकऱ्यांना पीक कर्ज नाकारलेल्या शेतकऱ्यांना किसान सभेच्या लढ्यामूळे पीक कर्ज मिळण्याचा मार्ग सुखर झाला आहे.



## किसान सभेच्या लढ्याला यश

सातत्याने शेतकऱ्यांचा कैवार घेऊन लढणारी किसान सभा पुन्हा एकदा शेतकऱ्याच्या मदतीला धावून आली. विविध बँकांमध्ये पीक कर्जासाठी शेतकऱ्यांनी दिलेले कर्ज मागणी अर्ज विविध कारणांमुळे शाखा व्यवस्थापकांनी प्रलंबित ठेवले होते. बरेच जणांना पीक कर्ज नाकारले होते. अनेक शेतकऱ्यांना जुने पीक कर्ज भरायला लावून पुन्हा नवीन पीक कर्ज वितरित केले नव्हते.विविध बँकांच्या या मनमानी आणि शेतकरी विरोधी भूमिकेविरोधात अखिल भारतीय किसान सभेने परळी येथील तहसील कार्यालयासमोर गुरुवार दि ८ ऑगस्ट रोजी जोरदार निदर्शने केली होती.या निदर्शनाची दखल घेत परळीचे तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली दि १३ ऑगस्ट रोजी सर्व बँकांचे प्रतिनिधी व निबंधक कार्यालय (ए.आर ऑफिसचे) चे प्रतिनिधी व किसान सभेच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत तहसील कार्यालयात बैठक झाली या बैठकीत बँकांनी आपले निर्धारित कर्ज वितरणाचे लक्ष पूर्ण केले नसल्याची बाब प्रशासनाच्या समोर आले. कर्ज वितरणा संदर्भात परळी तालुक्यातील सर्व बैंक व्यवस्थापकांचे अधिकार काढून घेतले असल्याची माहिती व्यवस्थापकांच्यावतीने देण्यात आली यासंदर्भातील कुठलीही माहिती ए आर ऑफिस ला नसल्याची त्यांची अत्यांत उदासीन भूमिका समोर आल्याने किसान सभेच्या प्रतिनिधीनी कर्ज वितरणाची मागणी लावून धरली.किसान सभेची मागणी लक्ष्यात घेत तहसीलदार मुंडे यांनी आततापर्यंत पीक कर्जाचा लाभ न मिळू शकलेल्या शेतकऱ्यांना दि.०१ सप्टेंबर पर्यंत पीक कर्जाचे वितरण करावे अशा सूचना दिल्या.

तहसीलदार व्यंकटेश मुंडे, विविध बँक प्रशासन व किसान सभेचे प्रतिनिधी यांच्या सविस्तर बैठक प्रसंगी तालुक्यातील बँकांचे शाखाधिकारी, सहाय्यक निबंधक कार्यालयाचे प्रमुख, नायब तहसीलदार बाबुराव रुपनर, किसान सभेचे जिल्हाध्यक्ष कॉ.एड.अजय बुरांडे जिल्हा सचिव कॉ.मुरलीधर नागरगोजे तालुकाध्यक्ष कॉ.भगवान बडे,अंकुश उबाळे आदी उपस्थित होते.

# राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाची शिवस्वराज्य यात्रा उद्या माजलगावात

## मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे नारायण डक यांचे आवाहन

**माजलगाव । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाने राज्यभरातून शिवस्वराज्य यात्रेला सुरूवात केली आहे. ही यात्रा १६ ऑगस्ट २०२४ शुक्रवारी माजलगाव येथे येत आहे. सकाळी दहा वाजता या यात्रेचे स्वागत करण्यात येऊन त्यानंतर जाहीर सभा होणार आहे. यासाठी राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते मार्गदर्शन करणार आहेत. यात्रेस मतदारसंघातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन पक्षाचे माजलगाव विधानसभेचे अध्यक्ष नारायण डक आणि पदाधिकाऱ्यांनी केले आहे.



राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्यावतीने राज्यभरातून शिवस्वराज्य यात्रेला सुरूवात झाली आहे. येऊ घातलेल्या निवडणुकिच्या पार्श्वभुमीवर या यात्रेला महत्व आले असून, यात्रेस मोठा प्रतिसाद मिळताना दिसत आहे. ही यात्रा शुक्रवारी सकाळी माजलगाव येथे येत असून माजलगाव – तेलगाव रोडवरील वृंदावन मंगल कार्यालयात सभेचे आयोजन करण्यात आले आहे. सभेला मार्गदर्शन करण्यासाठी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील, माजी गृहमंत्री अनिल देशमुख, खा.सुप्रीया सुळे, खा.डॉ.अमोल कोल्हे, माजी मंत्री राजेश टोपे, बीडचे खा.बजरंगबप्पा सोनवणे, युवा प्रदेशाध्यक्ष महेबूब शेख, पक्षाचे जिल्हाध्यक्ष तथा आ.संदिप क्षीरसागर, विद्यार्थी आघाडी प्रदेशाध्यक्ष सुनिल गव्हाणे उपस्थित राहणार आहेत. यावेळे बीडचे नवनिर्वाचीत खासदार बजरंगबप्पा सोनवणे यांचा जाहीर नागरी सत्कार होणार आहे. या कार्यक्रमास मतदासंघातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन माजलगाव मतदासंघाचे विधानसभा अध्यक्ष नारायणअण्णा डक, तालुका अध्यक्ष मनोहर डाके, युवराजकाका लगड, सुरेश गोरे यांनी केले आहे.

# नायब तहसीलदार रुपनर, अव्वल कारकून कचरे यांचा होणार सन्मान

**परळी । प्रतिनिधी**





परळीचे नायब तहसीलदार बी.एल.रुपनर यांची महसूल दिनानिमित्त जिल्ह्यातून एकमेव आदर्श नायब तहसीलदार म्हणून जिल्हा प्रशासनाने निवड केली आहे. त्याचबरोबर उपपविभागीय अधिकारी कार्यालयातील अव्वल कारकून बालाजी कचरे, तहसीलचे मंडळ आधिकारी गणेश फड, महसूल सहाय्यक गणेश सूत्रधर, तलाठी सुनील कांबळे, माधव मरगीळ, संगीता गीते यांच्यासह बीड जिल्हयातील इतर आदर्श अधिकारी व कर्मचारी यांचा महसूल खात्याच्या मूलभूत जबाबदाऱ्या पार पाडण्यात अथक प्रयत केल्याबद्दल महसूल दिनाचे औचित्या साधून १५ ऑगस्ट रोजी सकाळी ११:३० वाजता अंबाजोगाई येथील आर्यवीर मंगल कार्यलयातील कार्यक्रमात राज्याचे कृषी मंत्री व बीड जिल्हयाचे पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या हस्ते तर बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या अध्यक्षतेखाली व मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात येणार आहे.

# बीडचे गायक राज रायते यांचा पुण्यात सत्कार

**बीड । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड पुणे शहर तेली समाज आयोजित कौटुंबिक मेळावा व गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभामध्ये बीड चे गायक राज रायते यांचा ११ ऑगस्ट रोजी जाहीर सत्कार करीत त्यांच्या कलेचा सन्मान केला. यावेळी मान्यवरांची उपस्थिती होती.



पिंपरी चिंचवड चे तैलिक समाजाचे अध्यक्ष शिवराज शेलार व तेली संस्था पुणे यांनी या कार्यक्रमात राज यांनी आमंत्रित केले होते. या कार्यक्रमात राज रायते यांचा सर्व समाज बांधवांसमोर सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी राज यास भेटण्यासाठी परिसरातील चाहते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. यावेळी त्यांच्यासोबत फोटो काढण्यासाठी अक्षरशः झुंबड उडाली. या कार्यक्रमात गायक राज रायते यांनी त्यांचे संताजी जगनाडे महाराजांवरील आधारित गीत सादर केले. या गीताला मोठा प्रतिसाद मिळाला. यावेळी राज यास अनेकांनी रोख बक्षीसेही दिली. यावेळी राज भाषणात म्हणाले, मला माझ्या आई-वडीलांची साथ असल्याने मी आज या ठिकाणी उभा आहे. माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षिरसागर यांचीही मला खंबीर साथ आहे. तसेच परमेश्वर धारकर, प्रशांत भाऊ शिंदे (जामखेड), शिवलिंग शिरसागर व स्वराधीश सचिन राऊत (सर), रेकॉर्डिंग स्टुडिओ चे पवन शिंदे, सर्व समाज बांधवांचीही साथ आहे. आपली अशीच साथ व आशीर्वाद सदैव राहू द्या. समाजासाठी असेच भरपूर गीत मी काढणार आहे, असे राज रायते यांनी आपल्या भाषणात सांगितले.

# नेत्यांना आमदारकीचे डोहाळे; आष्टी मतदारसंघात डझनभर इच्छुकांचे दौरे

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

विधानसभेच्या निवडणूकीच्या तयारीने आष्टयैमतदार संघात जोर धरत्या आहे. उमेदवारी जाहिर होण्यापूर्वीच महायुतीच्या संभाव्य उमेदवार भाजपचे माजीमंत्री सुरेश धस व राष्ट्रकी काँग्रेसपक्षाचे आमदार बाळासाहेब आजबे व माजी आमदार भिमराव धोंडे हे मतदारसंघात गावा-गावात भेटी देत आहेत. व त्यांचे युवा नेते चर्चेत असणारे मुले अर्थातच जयदत्त(भैय्या)धस,यश (भैय्या)आजबे सह मा.आ.भिमराव धोंडे यांचे सुपुत्र अजय (भैय्या) धोंडे सुद्धा त्याबरोबर इतर जवळपास सहा ते अकरा इच्छुकांनी आपणही विधानसभेचा उमेदवार असल्याचे जाहीर करून मतदारसंघात संवाद दौरा सुरु केला आहे. यामुळे आष्टी पाटोदा शिरूर मतदारससंघाला एक डझनभर उमेदवार मिळाल्याची चर्चा समाजमाध्यमांवर होत आहे. विधानसभा निवडणूकीचा बिगुल बाजण्यास तीन महिनेचा वेळ आहे. परंतु उमेदवार आपणच असल्याचे सांगून कार्यकत्यांना कामाला लागावे असे आवाहन विद्यमान आमदार बाळासाहेब आजबे यांनी केले आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आम्हाला जागा असे सांगीतल्याचे माजी आमदार भीमराव धोंडे सांगत आहेत. महायुतीतुन भाजपचा उमेदवार आपणच असल्याचे माजीमंत्री सुरेश धस यांनी जाहीर केले आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे सर्वेसर्वा खासदार शरद पवार यांचा खंदा समर्थक म्हणून भाजपाचे माजी आमदार दावेदार म्हणून पुढे

माजी आमदार भीमराव धोंडे यांनी स्पष्ट केले असुन महाविकास आघाडीचा उमेदवार मीच आल्याचा

दावा साहेबराव दरेकर यांनी व्यक्त केला आहे. तर शरद पवार यांनी मी ओबीसी असल्याने मला शब्द व्यक्त केल्याल्याचे राम खाडे सांगितलं आहे. त्याचप्रमाणे उद्योजक महेश थोरवे यांनी शरद पवार यांची चारवेळा भेट घेतली असून त्यांनी उमेदवारी अंतीम केल्याने पत्रकार परिषदेत जाहिर केले आहे. शरदचंद्र पवार पक्षाचे युवा प्रदेशाध्यक्ष महेबूब शेख, मराठा आंदेलक सागर आमले है देखील विधानसभा निवडणूक लढवण्यास इच्छुक आहेत. यासर्व नेत्यांनी आपआपल्या परिने जनसंवादास सुरुवात केली असून यामुळे जनता मात्र चकीत झाली आहे. डझनभर आमदार असलेला मतदारसंघ अशी चर्चा आष्टी विधानसभा मतदारसंघात रंगली आहे.

# निवडणुकापुरतेच लोकांत जाणाऱ्यांना जनता माफ करणार नाही -जयदत्त धस

**आष्टी । प्रतिनिधी**

निवडणुका येतात जातात परंतु जनसामान्यापर्यंत आपण चांगले संपर्क ठेवले पाहिजेत निवडणुकीपुरतेच लोकात जाणं हे जनता माफ करत नाही परंतु आमचं धस कुटुंबीय प्रत्येकाच्या सुखदुःखात धावून जातात म्हणून जनता हे आम्हाला विसरत नाही असे मत आष्टी पाटोदा शिरूर मतदारसंघाचे युवा नेतृत्व जयदत्त भैय्या धस यांनी व्यक्त केले घाटा पिंपरी येथे युवा संवादक दौरा आयोजित केला होता त्यावेळेस गावकऱ्यांच्या वतीने त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले पुढे बोलताना ते म्हणाले की ज्यांना पिक विमा मिळाला नाही त्यांनी तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे तकार अर्ज दाखल करावेत या तक्रारीचा निरंकारण करण्यासाठी मी सदैव तत्पर राहील असे ते म्हणाले यावेळी गावातील छोटे-मोठे विविध प्रश्नावर माजी सरपंच गोवर्धनतळेकर व विनायक मुळीक यांनी गावातील समस्या सांगून त्याबाबत काही उपाय योजना करण्यात येत असेल तर करा असेही त्यांना सांगितले घाटा येथील ग्रामस्थांच्या वतीने पुष्पहार व फटाक्याचे आतषबाजी करत त्यांची जंगी स्वागत केले या कार्यक्रमाला सरपंच प्रल्हाद मुळीक धामणगाव शामा आबा तळेकर कडा कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक सरपंच मनोजशेठ गाढवे माजी उपसरपंच सदाशिव घुमरे माजी सरपंच गोवर्धन तळेकर माजी उपसरपंच अमोल तळेकर ज्येष्ठ नेते विनायक भाऊ मुळीक बाळासाहेब कांबळे अल्ताफ शेख अशोक बायकर रवी बायकर गोटीराम झांजे अशोक तळेकर व शाहु कोकरे सह मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रस्ताविक पत्रकार सुरेश कांबळे यांनी केली.



# गुत्तेदार थोरात व शाखा अभियंता नरहरे यांच्यावर मुरूम चोरी प्रकरणी मोक्का दाखल करा - विजय साळवे

**माजलगांव । प्रतिनिधी**

तालुक्यातील मौजे घळाटवाडी ग्रामपंचायत हद्दीतील लाखो रुपयांचा मुरूम हा विना परवाना काढता सरकारी रस्त्याच्या कामासाठी वापरणाऱ्या गुत्तेदार थोरात शाखा अभियंता यांच्या सह ग्रामसेवक , तलाठी , सरपंच यांच्या विरुद्ध संघटित गुन्हेगारी कायद्याप्रमाणे मोक्का लावून चोरी सह योग्य ते गुन्हे दाखल करून कठोर कार्यवाही करावी या मागणीसाठी दिनांक १३ ऑगस्ट २०२४ रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालया समोर स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेच्या वतीने उपोषण करण्यात आले.

माजलगाव तालुक्यातील महसुल प्रशासनासह जवळपास सर्वच कार्यालये हे भ्रष्टाचाराचे अड्डे बनलेले आहेत. येथील शासकिय कार्यालयामध्ये जनतेच्या समस्या सोडवण्या पेक्षा सर्व सामान्य जनतेची आडवणूक करून शासनाची मालमत्ता लुटण्याचे पाप करून पैसा स्वतःच्या घशात घालायचा कसा याकडेच अधिकाऱ्यासह कर्मचाऱ्यांचेही लक्ष लागलेले असते.



तालुक्यातील मौजे घळाटवाडी ते आनंदगाव या रस्त्याचे काम चार महिन्यापूर्वी सार्वजनिक बांधकाम उपविभाग माजलगाव या कार्यालया अंतर्गत झाले असून सदरील काम हे शासनाने ठरवलेल्या अंदाज पत्रका नुसार न करता मनमानी पद्धतीने शाखा अभियंता नरहरे यांच्या मदतीने गुत्तेदार थोरात यांनी केले असुन या कामासाठी वापरलेला मुरूम हा घळाटवाडी ग्राम पंचायतीच्या शिवारातून कुठलाही परवाना नसतांना एक जेसीबी यंत्र व तीन हायवा च्या साहाय्याने अवैधरित्या सतत तिन दिवस मार्च महिण्याच्या २३, २४ , २५ तारखेला शनीवार , रविवार व सोमवार धूलीवंदन या सुट्टीच्या काळात संधी साधून गुत्तेदार थोरात शाखा अभियंता नरहरे यांनी सरपंच , ग्रामसेवक व तलाठी यांच्याशी संगनमत करून वरिष्ठ अधिकाऱ्यांची व गावकऱ्यांची दिशाभुल करून मुरूम चोरी सारखा अपराध केलेला आहे. आशा मुरूम चोर अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मुजोरी धोरणाचा निषेध व्यक्त करत स्वाभिमानी नेते विजय साळवे यांच्या नेतृत्वाखाली उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर अमरण उपोषण करण्यात आले प्रसंगी स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेचे पंडीत ओव्हाळ , अंजेराम घनघाव, वशिष्ठ लांगडे, विशाल ससाणे , वैजनाथ गडसिंग , राजकुमार मोरे , सय्यद अन्वर , गंगाधर सोनपसारे , विश्वनाथ तोडके , धम्मानंद गावडे , भास्कर पौळ , शेख अर्शद , आनंद साळवे , सखाराम चोपडे , कन्हेया बनगे , सुरेश साळवे , साहेबराव टाकणखार , विलास खळगे , चंद्रकांत टाकणखार , सिद्धार्थ गाडेकर उपोषणकर्ते उपस्थित होते. या प्रकरणातील संबंधीत गुन्हेगारांवर आठ दिवसाच्या आत गुन्हे दाखल करून कारवाई करण्यात येईल असे आश्वासन उपविभागीय अधिकारी गौरव झंोले यांनी दिल्या नंतर उपोषण सोडण्यात आले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष


# इसिसचा दहशतवादी रिझवान अलीची पुणे एटीएसकडून चौकशी, गरोदर पत्नी गायब

पुणे । प्रतिनिधी

दिल्ली पोलिसांनी इसिसचा मोस्ट वॉन्टेड दहशतवादी रिझवान अब्दुल अली ९ ऑगस्टला अटक केली आहे. रिझवान हा राष्ट्रीय तपास संस्थेच्या (एनआयए) मोस्ट वाँटेड यादीत होता. रिझवानवरती तीन लाख रुपयांचे रोख बक्षीस ठेवण्यात आले होते. रिझवान हा पुणे खडखड मॉड्यूलशी संबंधित होता. आयएसआयएसशी संबंधित दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी असल्याबद्दल रिझवानवरती तीन लाख रुपयांचे बक्षीस ठेवण्यात आले होते. या रिझवान अलीची आता पुणे दहशतवाद विरोधी पथक करणार आहे.

रिझवान अली याला काहीच दिवसांपूर्वी दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने अटक केली होती.





रिझवान अली हा पुणे इसिस मॉडेलशी संबंधित वॉन्टेड दहशतवादी आहे. रिझवान अली आणि शाहनवाज आलम हे दोघे ही त्यांच्या पत्नीसह पुण्यात वास्तव्यास होते. रिझवान अली याची पत्नी गरोदर असल्यामुळे तो उपचारासाठी तिला दिल्लीला घेऊन गेला होता. या दोघांच्या पत्नींचा शोध पुणे दहशतवाद विरोधी पथकाकडून सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. पुणे आयएसआयएस मॉड्यूलमध्ये मुख्य भूमिकेसाठी रिझवानवर अधिकाऱ्यांनी ३ लाख रुपयांचे बक्षीस ठेवले होते. याशिवाय अन्य दहशतवादी कारवायांमध्ये त्याचा सहभाग तपासला जात आहे.

९ ऑगस्टला (शुक्रवारी) पहाटेच्या सुमारास दिल्ली-फरिदाबाद सीमेवरून रिझवानला शस्त्रास्त्रांसह पकडण्यात आले होते. U-P- अंतर्गत एफआयआर नोंदवण्यात आला असून रिझवानचे नेटवर्क नष्ट करण्यासाठी छापे टाकण्यात येत आहेत. रिझवान आणि अन्य दोन दहशतवादी मोस्ट वॉन्टेड यादीत होते. त्यापैकी एक शाहनवाज याला गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये अटक करण्यात आली होती, तर अब्दुल्ला उर्फ डायपरवाला अद्याप फरार आहे. एनआयएच्या मोस्ट वाँटेड यादीत दहशतवादी रिजवान अलीचा समावेश होता. पुणे खडखड मॉड्यूलच्या अनेक सदस्यांना पुणे पोलिस आणि छख- ने यापूर्वी अटक केली होती. या वर्षी मार्चमध्ये दहशतवाद विरोधी एजन्सीने दाखल केलेल्या पुरवणी आरोपपत्रात रिझवानच्या नावासह अन्य तीन आरोपींचाही समावेश होता. एनआयएने पुणे खडखड मॉड्यूल प्रकरणात एकूण ११ आरोपींवर आरोप ठेवले आहेत. हे प्रकरण पुण्यातील महाराष्ट्रातील खडखड शी संबंधित शस्त्रे, स्फोटके, रसायने आणि साहित्य जप्त करण्याशी संबंधित आहे.

### दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलला १५ ऑगस्टपूर्वी मोठे यश

दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलला १५ ऑगस्टपूर्वी मोठे यश मिळालं. दिल्ली पोलिसांनी खडखड मॉड्यूलच्या दहशतवाद्याला अटक केली. रिझवान असे या दहशतवाद्याचे नाव आहे. रिझवान हा दिल्लीतील दर्यागंजचा रहिवासी आहे. पुणे पोलिसांच्या तावडीतून तो पळून गेल्यापासून तो लपलेला होता. दिल्ली पोलिसांनी शुक्रवारी त्याला अटक केली आहे. त्याच्याकडून अनेक शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत.

# एसीपी सतीश गोवेकर यांना राष्ट्रपती पोलिस पदक जाहीर; तर राजेंद्र डहाळे यांना दुसऱ्यांदा पदक

पुणे - शहर पोलिस दलातील गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलिस आयुक्त सतीश रघुवीर गोवेकर यांना उल्लेखनीय सेवेबद्दल राष्ट्रपती पोलिस पदक जाहीर झाले आहे. गुन्हेगारांवर दबदबा असलेल्या गोवेकर यांनी त्यांच्या सेवा कालावधीत अतिशय क्लिष्ट आणि संवेदनशील गुन्हे उघडकीस आणण्यात यश मिळविले आहे.

सतीश गोवेकर यांनी बहुचर्चित नयना पूजारी खून प्रकरणातील ससून रुग्णालयातून फरार झालेल्या आरोपींना अटक केली होती. तसेच, ललित पाटील ड्रग प्रकरणाचा पर्दाफाश करीत आरोपींना अटक करण्यात त्यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली आहे. गोवेकर हे १९८८ बॅचचे पोलिस अधिकारी आहेत. त्यांना वैशिष्ट्यपूर्ण सेवा आणि उल्लेखनीय कामगिरीबद्दल राष्ट्रपती पदकाने सन्मानित करण्यात आले आहे.





गोवेकर यांनी दत्तवाडी, कोंढवा पोलिस ठाण्यात वरिष्ठ पोलिस निरीक्षक म्हणून उत्तम कामगिरी बजावली. २०१७ मध्ये सहाय्यक पोलिस आयुक्त या पदावर पदोन्नती झाल्यानंतर प्रथम राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, नवी मुंबई तसेच पुणे शहरात फरासखाना विभाग आणि सध्या गुन्हे शाखेत कर्तव्य बजावत आहेत.

त्यांनी पोलिस दलात ३६ वर्षे सेवा बजावली आहे. त्यांच्या सेवा कालावधीत त्यांना ५०३ बक्षीसे मिळालेली आहेत. त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे त्यांना २००८ मध्ये पोलिस महासंचालक पदक, २०११ मध्ये गुणवत्तापूर्ण सेवेसाठी पोलिस पदक देवून सन्मानित करण्यात आले आहे.

डहाळे यांना दुसऱ्यांदा राष्ट्रपती पोलिस पदक

राजेंद्र डहाळे यांना दुसऱ्यांदा राष्ट्रपती पोलिस पदक पुरस्कार जाहीर झाले आहे. ते सध्या महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनीचे संचालक व विशेष पोलिस महानिरीक्षक म्हणून कार्यरत आहेत.

# पुण्यात हसन मुश्रीफांच्या नावाने निवृत्त शिक्षिकेकडून २० लाख उकळले

पुणे । प्रतिनिधी

निवृत्त वृद्ध शिक्षिकेला पोलिस उपायुक्ताच्या नावाने कॉल करून माजी मंत्री हसन मुश्रीफ यांच्यासाठी मनीलाँड्रींग केले आहे, असे सांगून तुमच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून तुम्हाला अटक करावी लागेल. असे म्हणत २० लाख उकळल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी तोतया पोलिस उपायुक्त नरेंद्र गुप्ता याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी उषा मुरलीधर व्यास (वय ७१, रा. प्राईम रेसीडेन्सी, विठ्ठलनगर, हडपसर) यांनी याबाबत पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, उषा व्यास मागील बारा वर्षांपासून हडपसर परिसरात राहतात. त्या राजस्थान येथून शिक्षक पदावरून निवृत्त झाल्या आहेत. तसेच त्या पेन्शनर आहेत. ३१ मे रोजी त्या घरात असताना त्यांना त्याच्या मोबाईलवर पीएसआय नरेंद्र गुप्ता नावाच्या व्यक्तीचा फोन आला. त्याने व्यास यांच्याशी हिंदीत संवाद साधत तुम्ही मंत्री हसन मुश्रीफ यांच्यासाठी मनीलाँड्रींग केले आहे. तसेच बेकायदेशीर पिस्तूल खरेदीसाठी पैसे पुरवून तुम्ही ड्रगचा व्यापार करत आहे, असे सांगून त्या महिलेला धमकावले. हसन मुश्रीफ आमच्या ताब्यात असून तुमच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. त्यात तुम्हाला अटक करावी लागेल, अटक झाल्यावर तुम्हाला मुंबई येथे ठेवण्यात येईल. तुमची पेन्शन बंद करण्यात येईल, असे खोटे सांगून गुन्हा दाखल करण्यात आल्याची पीडीएफ पाठवली. त्याच्या बोलण्यामुळे व्यास ह्या घाबरल्या. त्यांनी गुप्ता नावाच्या त्या व्यक्तीला मी यातून कशी वाचेल, अशी विचारणा केली. तेव्हा त्याने तुम्हाला यातून जामीन मिळू शकत नाही. त्यासाठी तुम्हाला तुमच्या खात्यात जेवढे पैसे असतील ते आमच्या खात्यात पाठवले लागतील, असे म्हणत व्हेरीफिकेशन नंतर तुम्हाला पुन्हा पैसे परत करण्यात येईल, असे सांगण्यात आले.

### ४ जूनरोजी ऑनलाइन तक्रार

गुप्ता नावाच्या व्यक्तीने पाठविलेल्या खात्यावर व्यास यांनी तब्बल २० लाख पाठविले. दि. ३१ मे ते ३ जून दरम्यान व्यास यांना कोणाला फोन करता येत नव्हता की, त्या गुप्ता नावाच्या व्यक्ती व्यतिरिक्त कोणाचा फोन येत नव्हता. त्यामुळे त्यांना कोणाशी संपर्क साधता आला नाही. व्यास या घाबरल्यामुळे त्यांनी ही बाब कुणाला सांगितली नाही. पैसे पाठविल्याबाबत फोन केल्यानंतर संबंधित व्यक्तीने तुम्ही निवांत झोपा असे सांगून फोन ठेवला. नंतर त्यांनी संबंधित आरोपींच्या दोन नंबरवर फोन केला. तेव्हा त्यांचा फोन उचलला गेला नाही. त्यानंतर त्यांना आपली फसवणूक झाल्याचे समजल्यानंतर त्यांनी ४ जूनरोजी ऑनलाइन तक्रार दिली. पुढील तपास हडपसर पोलिस करत आहेत.

# भाजपा माजी नगरसेवक शिळीमकर यांच्यासह चार जणावर गुन्हा दाखल

पुणे । प्रतिनिधी

भाजपचे माजी नगरसेवक राजेंद्र शिळीमकर यांच्यावर सहकारनगर पोलीस स्टेशनमध्ये मारहाणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल झालेल्यांमध्ये राजेंद्र शिळीमकर यांच्यासह त्यांचा मुलगा अथर्व शिळीमकर, पुतण्या अर्चित शिळीमकर आणि महेश शिळीमकर अशा चौघांचा समावेश आहे.



शंकर महाराज मठात रूद्रअभिषेक करण्यासाठी मज्जाव करत, शिळीमकर यांनी मारहाण केल्याप्रकरणी चेतन आरडे यांचे उपोषण सुरू होत. या उपोषणाची दखल घेत पोलिसांकडून शिळीमकर पिता पुत्र पुतण्यांवर कारवाई केली आहे.

शंकर महाराज मठात रूद्रअभिषेक करण्याकरीता मज्जाव करत, अश्लील आणि जातीवाचक शिवीगाळ करत व बेदम मारहाण केल्याचा आरोप शिळीमकरांवर आहे. या प्रकरणी पीडित चेतन आरोडे गेल्या पाच दिवसांपासून पुणे समाज कल्याण विभागासमोर उपोषणास बसले होते. त्यानंतर पोलिसांनी कारवाईची पाऊले उचलली. घटना घडली त्यावेळी याप्रकरणी चेतन यांनी ११२ नंबरवर डायल करून पोलिसात तक्रार केली असता पोलीस घटनास्थळी पोहचले नाहीत.

यावेळी चेतन हे सहकारनगर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यासाठी (इगझ) गेले असता पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांनी कुठलाही जबाब वा तक्रार घेतली नाही. त्यामुळे पीडित हे गेल्या पाच दिवसांपासून उपोषणास बसले होते.

यावेळी मारहाण व शिवीगाळ करण्याऱ्या संबंधित व्यक्तीपासून जीवितास धोका असून त्यांच्यावरती अनुसूचित जाती कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात यावा व मला न्याय द्यावा असे आरडे यांनी लेखी पत्र दिल होत. अखेर या पत्राची दखल घेत शिळीमकरांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पुणेकरांना दिलासा! चार दिवसात झिका व्हायरसची रूग्णसंख्या 'जैसे थे', झिकाची साखळी तुटतेय

पुणे : पुणेकरांना दिलासा देणारी बातमी समोर आली आहे. गेल्या काही दिवसांमध्ये सातत्याने वाढत असलेली झिका व्हायरसच्या रूग्णांची संख्या सध्या स्थिर असल्याची माहिती आहे. गेल्या ४ दिवसांमध्ये झिका व्हायरसचा एकही रूग्ण आढळला नसल्याची माहिती आहे. शहरात झिकाची साखळी तुटताना दिसत आहे. गेल्या ४ दिवसांपासून झिकाच्या नवीन रुग्णांची संख्या घटली आहे. ९ ऑगस्ट ते १२ ऑगस्ट दरम्यान एकाही नव्या रुग्णाची नोंद झाली नसल्याची माहिती समोर आली आहे. सध्या शहरात ७५ रुग्णसंख्या असून, नवीन रुग्णवाढ नसल्याने बाब समोर आली आहे. पुणे शहरात झिकाचा पहिला रुग्ण हा २० जूनला आढळला होता.

गेल्या काही दिवसांमध्ये पुणे शहर परिसरात मोठ्या प्रमाणावर पाऊस झाला होता. त्यामुळे डासांचे प्रमाण देखील वाढले होते. याच दरम्यानच्या काळात रूग्णसंख्या झपाट्याने वाढत होती. आता पाऊस ओसरल्याने नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला आहे. झिका (नळज्ञर तळींीी) हा डासांमुळे इतरांना पसरणारा आजार असला तरी तो गर्भवती महिलांच्या बाळांसाठी हानिकारक ठरतो. आतापर्यंत ७५ पैकी ३२ रुग्ण या गर्भवती महिला आहेत. एनआयव्हीच्या मते हा विषाणू एशियन असल्याने तो फारसा हानिकारक नाही. असे सध्या दिसत असले तरी प्रत्यक्ष प्रसूती झाल्यावरच त्याचा खरा परिणाम दिसून येईल. पुणे शहरात झिका विषाणूचा धोका झाला कमी झाल्याचं दिसून येत आहे. गेल्या काही दिवसापासून झिकाच्या नवीन रुग्णांची संख्या घटली आहे. नव्या रुग्णांची नोंद नसल्याने दिलासा मिळाला आहे. आतापर्यंत ४ जणांचा मृत्यू झाल्याचे आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. पण या रुग्णांना हृदयविकार आणि यकृताचे आजारही होते, त्यामुळे त्यांची प्रकृती ६८ ते ७८ वर्षांच्या दरम्यान होती.

# समस्यांमुळे विमाननगर झाले बकाल; खड्डे, कचरा आणि जागोजागी भिकाऱ्यांचे बस्तान

वडगाव शेरी । प्रतिनिधी

पदपथावर टाकण्यात आलेला कचरा, वाढलेले गवत, सर्वत्र उखडलेले रस्ते आणि पसरलेली खडी, जागोजागी असलेले पालापाचोळ्याचे ढिग, रस्त्यावर लटकलेल्या केबल, पदपथावर बस्तान मांडलेले भिकारी, जागोजागी चिटकवलेल्या आणि लटकवलेल्या अनधिकृत जाहिराती यामुळे संपूर्ण विमाननगरला बकालपणा आला आहे. मागील अनेक वर्षापासून हीच परिस्थिती कायम असल्यामुळे रहिवाशांच्या मनात रोष निर्माण झाला आहे.

विमाननगर मध्ये अनेक मॉल, पंचतारांकित हॉटेल्स, महाविद्यालय, मोठी बाजारपेठ आणि अनेक आयटी कंपन्यांची कार्यालय आहेत. विमानतळ शेजारी असल्यामुळे मोठी रहदारी येथील रस्त्यांवर असते. अशा



स्थितीतही पुणे महानगरपालिका प्रशासन येथील समस्या सोडवण्यात अपयशी ठरले आहे.

त्यामुळे 'सेवा नाही तर मालमत्ता कर देणार नाही' अशी भूमिका घेत येथील सामाजिक कार्यकर्त्या कनिज सुखराणी यांनी ग्राहक न्यायालयात दाद मागितली आहे. २०२१ या वर्षात ग्राहक न्यायालयात खटला दाखल करण्यात आला असून या खटल्याची सुनावणी आता अंतिम टप्प्यात आली आहे.

गणपती मंदिर चौक, दत्त मंदिर चौक, श्रीकृष्णा चौक, राजीव नगर रस्ता आणि चौक, साकोरे नगर परिसर, विमानतळ रस्ता या सर्व ठिकाणी असलेल्या खड्ड्यांमुळे आणि निकृष्ट दर्जाच्या रस्त्याची खडी पसरून संपूर्ण रस्त्याची चाळण झाली आहे. म्हाडाकडे जाणारा रस्ता पदपथावर गुडघ्या इतके गवत वाढल्यामुळे आणि जागोजागी त्यावर कचरा पडलेला असल्यामुळे पादचाऱ्यांना वापरता येत नाही. विमाननगर चौकातील रस्त्यावर आणि सीसीडी चौकातील पदपथावर शेकडो भिकारी झोपड्या करून राहू लागले आहेत. विमाननगरच्या पादचारी भुयारी मार्गात पाणी साचल्यामुळे त्याचा वापर बंद झाला आहे. म्हाडा सोसायटी परिसरात साफसफाई होत नसल्यामुळे अनेक लोकांच्या आरोग्यावर परिणाम झाला आहे. गणपती मंदिर चौकात कचऱ्याचे ढीग साचत असल्यामुळे तसेच आनंद विद्यानिकेतन मागील रस्त्यावर हॉटेलचा कचरा फेकला जात असल्यामुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय विद्यार्थी काँग्रेस अध्यक्षपदी सनी मानकर यांची निवड

पुणे । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी(झींपश) पुण्यातील सनी मानकर यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय विद्यार्थी काँग्रेस अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात येत असल्याचे पत्र दिले.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकारी अध्यक्ष खासदार प्रफुल्ल पटेल प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे,राष्ट्रीय युवक अध्यक्ष धीरज शर्मा उपस्थित होते.



या नियुक्ती बाबत सनी मानकर म्हणाले की,मी एक सर्व कुटुंबातील तरुण असून मागील १४ वर्षापासुन पक्ष संघटनेत काम करित आहे. आजवर अजितदादा पवार यांनी दिलेली प्रत्येक जबाबदारी चांगल्या प्रकारे पाडली आहे.यामुळे अजितदादा पवार यांनी माझी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय विद्यार्थी अध्यक्ष पदी नियुक्ती केली आहे. त्याबद्दल दादांचे विशेष आभार आणि येत्या काळात देशातील प्रत्येक राज्यात पक्ष संघटन वाढविण्यावर भर राहणार आहे.तसेच देशातील प्रत्येक विद्यापीठात कशा प्रकारे विद्यार्थ्यांना चांगले वातावरण राहील, उत्तम दर्जाचे शिक्षण मिळेल, यासाठी माझा प्रयत्न राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच ते पुढे म्हणाले की,मी पुणे शहरातील असून आपल्या शहरात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आहे.या विद्यापीठात देशाच्या कानाकोपऱ्यामधून विद्यार्थी शिक्षण घेण्यास येत असतात.मात्र मागील काही घटना लक्षात घेतल्यावर,येत्या काही दिवसात विद्यापीठात शिक्षण घेणार्या विद्यार्थी वर्गासोबत चर्चा करून त्यांच्या समस्या जाणून घेणार आहे. त्याबाबत विद्यापीठ प्रशासनासोबत चर्चा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### गोव्यात २० ते २२ ऑगस्ट दरम्यान कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस राष्ट्रीय अध्यक्ष पदाचा नियुक्ती होऊन काही दिवस होत नाही.तोवर देशातील विशेष पदाधिकाऱ्यांसाठी येत्या २० ते २२ ऑगस्ट २०२४ दरम्यान गोवा राज्यात युवक आणि विद्यार्थी काँग्रेस च्या वतीने तीन दिवसीय कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.या शिबिराचे उदघाटन राज्याच्या महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांच्या हस्ते होणार आहे.तर समारोप राज्याचे कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्या भाषणांच्या होणार आहे.या शिबिराच्या माध्यमांतून देशभरातील पदाधिकारी एकाच छताखाली येणार असून या माध्यमांतून विचाराची देवाणघेवाण होण्यास मदत होणार आहे.अशी माहिती राष्ट्रीय विद्यार्थी काँग्रेसचे अध्यक्ष सनी मानकर यांनी दिली.

# गणेश विसर्जन मिरवणुकीत कर्णकर्कश आवाजावर निर्बंध - पोलिस आयुक्त अमितेश कुमार

पुणे । प्रतिनिधी

गणेश विसर्जन मिरवणुकीत कर्णकर्कश आवाजावर आता पोलिसांचा 'वॉच' राहणार आहे. साउंडचा दणदणाट करून नियमाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. याबाबत साउंड व्यावसायिकांच्या संघटनेशी चर्चा करण्यात येणार असल्याची माहिती पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली.

विसर्जन मिरवणुकीत दरवर्षी मोठ्या प्रमाणावर साउंडच्या भिंती लावल्या जातात. त्यांच्या कर्णकर्कश आवाजामुळे नागरिकांना त्रास होत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. त्यावर मिरवणुकीतील साउंडच्या दणदणाटाविरोधात सार्वजनिक मंडळांकडून सकारात्मक पावले टाकली जात आहेत. शहराबाहेरून येणाऱ्या साउंड सिस्टीम चालकांकडून नियमांचे पालन होत नाही. त्यांच्यावर



पोलिसांनी लगाम घालावा, आवाजावर मर्यादा आणावी, अशी मागणी मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी मंगळवारी (ता. १३) 'सकाळ'च्या वतीने आयोजित बैठकीत केली होती. या पार्श्वभूमीवर पोलिस आयुक्त अमितेश कुमार म्हणाले, ''मोठ्या प्रमाणावर साउंडच्या भिंती लावल्याने लोकांना त्रास होत आहे. याबाबत लवकरच साउंड व्यावसायिकांची बैठक बोलावून चर्चा करण्यात येणार आहे.''

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर अमितेश कुमार यांनी गणेश मंडळांच्या सलग दोन दिवस बैठका घेतल्या. सोमवारी पोलिस मुख्यालयात शहरातील सार्वजनिक मंडळांच्या, तर मंगळवारी पोलिस आयुक्तालयात मानाच्या मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित केली होती. या बैठकीनंतर अमितेश कुमार यांनी पत्रकारांशी संवाद साधला. ते म्हणाले, 'मागील विसर्जन मिरवणुकीत डोळे दिपवणाऱ्या लेझर प्रकाशझोतांचा वापर मोठ्या प्रमाणावर झाला. त्याचा अनेकांना त्रास झाला होता. यंदाच्या विसर्जन मिरवणुकीत लेझर प्रकाशझोतांचा वापर करण्यास बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचा वापर केल्यास कारवाईचा इशाराही त्यांनी दिला.

विसर्जन मिरवणुकीत मंडळांसमोरील पथके, वादकांची संख्या याबाबतही ढोल-ताशा महासंघाच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात येणार आहे. दरम्यान, मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी विसर्जन मिरवणुकीदरम्यान वाहतूक समस्या आणि पार्किंगबाबत सूचना केल्या आहेत. वाहतूक समस्या सोडविण्यासाठी नियोजन करण्यात येत आहे. चोरीच्या घटना रोखण्यासाठी पोलिसांनी तयारी केली आहे, असे अमितेश कुमार यांनी सांगितले.

cmyk